नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

वर्ष २३ / अंक : चवथा

ऑगस्ट १९६८

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) आॅगस्ट १९६८ (अंक ४

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
धंतोली, नागपूर-१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ

७२ श्रीकृष्ण चरित्र कथा
डॉ. बा. ना. मुण्डी, इंदूर

७८ संगीत आणि साहित्य
प्रा. व्ही. व्ही. देशपांडे

८४ प्रबंध - पदवी
डॉ. द. भि. कुळकर्णी

८६ महाराष्ट्र राज्याच्या श्वेतपत्रिकेंतील भाषाविषयक धोरण
प्रा. श्री. मा. कुळकर्णी व डॉ. श्री. भा. वर्णेकर

८७ पुस्तक परीक्षण : अंगारयात्रा
स. वि. जोग

८९ मराठी समीक्षेचा विकास :
डॉ. अ. ना. देशपांडे आणि
प्रा. म. शं. वावगांवकर

१ संघवार्ता

(नागपूर आकाशवाणीवरील 'मराठी समीक्षेचा विकास' या भाषणमालिकेतील दोन भाषणे येथे दिली आहेत. प्रा. श्री. मा. कुलकर्णी व प्रा. द. भि. कुलकर्णी यांची नंतरची दोन भाषणे पुढील अंकात प्रसिद्ध होतील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकनाथ पूर्व कालीन काव्य
कृष्णदास सामा कृत

श्रीकृष्ण चरित्र कथा

(श्रीमद्भागवत दशम स्कंध)

डॉ. वा. ना. मुण्डी, इंदूर

विदर्भ संशोधन मडळ, नागपूरचे ३०-३-६८ ला प्रकाशित झालेले १९६७ चे "वार्षिक" डॉ. कात्रे, (उज्जयिनी) याजकडे १५-४-६८ ला आले ते आज (१।५।६८) पहावयास मिळाले. त्यांतील डॉ. प्रभुदेसाई यांचा "शाम राजाची भागवतावरील मराठी टीका" हा लेख वाचला. गेल्या जून १९६७ मध्ये मला **कृष्णदास सामाच्या "श्रीकृष्ण चरित्र कथे"** चे देवनागरी लिपीतील एक त्रुटित हस्तलिखित पहावयास-वाचावयास मिळाले. मी ते वाचले, संक्षिप्त टिपणे घेतलीत, लेखक व लेखनाची माहिती मिळविली व मुद्रणाच्या दृष्टीने सटीप प्रत तयार करण्याच्या कामास लागलो. डॉ. पिसुर्लेकर यांनी रोमन लिपीतून मराठी लिप्यंतरित केलेला १९ वा अवस्वरू तुलनेसाठी माझ्यासमोर आहे. तेवढ्यांत वि. सं. मंडळाच्या वार्षिकांत जशी मला माहिती वाचावयास मिळाली. तशीच माझ्याजवळ असलेल्या हस्तलिखिताची माहिती अभ्यासक-विद्वानासमोर असावी म्हणून येथे देत आहे. " एकमेका साहृय करू " प्रमाणे झाला तर या माहितीचा इष्ट तोच लाभ होईल. दोन प्रती उपलब्ध असता त्यांचे एकत्र संपादन झाले तर आनंदाचीच गोष्ट होईल.

ग्रंथनाम— श्रीकृष्ण चरित्र कथा हेच नांव सर्वत्र आहे. (श्रीकृष्ण चरित्र कथा सांगता.. १।१३; व बहुतेक अध्याय अवस्वरू समाप्तीच्या वेळी " श्रीकृष्ण चरित्र कथा" असेच आहे). (२२१।१९) येथे " कृष्ण चरित्र" म्हटले आहे.

लेखकाचे नांव— सामराज (स्त्री रामाराजा नंदनु। विष्णुभक्ति परायणु। नावे **सामराजु**-२४९ । १९). अवस्वरू समाप्तीच्या वेळी तो स्वतःस **कृष्णदास सामा** म्हणतो. कारण तो कृष्णाचा दास होता (झाला कृस्ट्णाचा दासु २५० । १९). यालाच शामराज, शामा असेही म्हणतात.

गुरु— याच्या गुरूचे नांव **गोविंद**. त्याने त्याला "उपदेसिले". म्हणजे हा त्याचा उपदेश गुरू. पण ज्याचा "दास" म्हणवितो तो "कृष्ण" कोण ? हा स्वतःस विष्णुभक्तिपरायण, विठ्ठल देवाची आराधना करणारा असा मानतो, त्यावरून तर "कृष्ण" दास म्हणवीत नसेल? (तो स्त्री विठ्ठल देवो आरावितां। प्रसन्न होउनिया भक्तां। **गोविंद** स्वरूपें येउनी माथां। ठेविला करू ॥२५१॥ जे मुक्तीचे बीज। अंतिचे तारक निज। ते सांगितले तेणे मज। अखेरें दोनी ॥२५२॥ जी जिवांची सोहिरी । जेणे पाविजे निज मंदिरीं। जेथें पातलेयां मागुते संसारीं। परतणे नाहीं॥२५३॥ पुनित करावया माथें। मज तेणे **स्त्री गुरूनाथें। उपदेसिलें एकांती।** ब्रह्मग्न्यान ॥ २५४॥ माझेवरी करूनी कृपा। मनी धरूनु कृपा। मिळवुनी घेतले स्वरूपा। आपुलेया ॥२५५। १९

श्री गुरुच्या कृपेबद्दल सामाने जागोजागी कृतज्ञता व्यक्तविली आहेच. " अथवा श्री **गुरुनाथ। मस्तकि ठेउनिया** हातु। हृदयि प्रघटे गभस्ति। ज्ञानरासि ॥३।३॥" माझे अल्पमति लंगडें। बोलिले परमेस्वराचे पवाडे। **आदरू धरूनिया** फुडे। स्त्री गुरुचा ॥ २४५ । १९ ॥

इतर अवस्वरूतही असलेच उल्लेख आहेत. हे **गोविंद** गुरु " **पंढरपुर निवासी** " असल्याचे अध्याय ९ । १६३ वरून कळते.

उपास्य देवता— सामाची उपास्य देवता नेमकी कोणती हे स्पष्ट होत नाही. " आपुली **उपास्य देवता**। सुवी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होवावेया चिता ॥ सांगो आचरिली कथा । खेळु ते याचा" २५७ । १९ असे म्हटले आहे खरे, पण दुसरीकडे "विष्णु भक्ति परायणु" असेही म्हटले आहे. गुरूचे उपास्य विठ्ठल होते कीं काय ? सामा स्वत: केळशीचा; तेथील परमेश्वरी शांतादुर्गा, मग तीच त्याची उपास्य का ? एरवी तो स्वत:स " कृष्ण " दास म्हणवितो पण हा "कृष्ण" नेमका कोण ते सांगत नाही.

ग्रंथलेखकाची माहिती, लेखनस्थळ व काळ

माझ्या जवळच्या प्रतीतील उपलब्ध भागांत यापैकी एकाही बाबीची माहिती नाही. परंतु डॉ. पिसुर्लेकर प्रतीतील पुढील भागावरून ही माहिती मिळते. हाच उतारा डॉ. प्रभुदेसाई यांनीही दिला आहे. (पाठभेद लक्षणीय)

"व्येय संवत्सरीं । राजा सालिवाहनु राज्य करी । **चौदासें अठ्ठेचाळीस वेरी** । वरूसें जाहलीं ॥२४६॥ तो सकु चालता ते वरसीं । वैसाख मधुसुधरीं मासी । सुक्ल पख्खी त्रियोदसीं । आरंभु केला ॥ २४७ ॥ **केळसी** ग्राम व्रम्हपुरीं । जेथें **सांता दुर्गा** परमेस्वरी । कौसिक गोत्र रूसी माझारीं वरीस्ट जे ॥ २४८ ॥ ते गोत्रकुळीं उत्पन्नु । स्त्री **रामाराज** नंदनु । विष्णुभक्ति परमाणु । नांवे **सामराजु** ॥ २४९ ॥ झाला **कृस्ट्णाचा** दासु । तारावेया संसारू गर्भवासु । भक्ति करूनी व्रुसिकेसु । आंराधिला ॥ २५० । १९ ॥

प्रस्तुत हस्तलिखित

उपलब्ध ग्रंथभाग बराच जुना, जीर्णशीर्ण असून त्याची अधली मधली पानेही नाहीत. तो खण्डित स्वरूपातच प्राप्य आहे. एकूण पत्रसंख्या शेचाळीस (४६) आहे. प्रत्येक पानांत पंक्ति ११ ते १३ व अक्षरे ३० ते ३२ आहेत. आकार ८" x ५" आहे. उपलब्ध पाने पुढीलप्रमाणें:– ११–१२; ३१-४०; ५९-७२; ७५-७६; ७९–८८; ९१–९६ तथा १०१–१०२. ह्या पानांवरून एकूण केवळ १६ अवस्वरूच या प्रतीत असल्याचे कळते. केवळ बारावा अवस्वरूच पूर्ण आहे पण दुर्दैवाने या पूर्ण अवस्वरूतही लेखकाचे स्थळ, काळ, परंपरा किंवा स्व-परिचय नाही ही गोठीच उणीव आहे. या प्रतीत ३, ६, ७, ११, १२, १३, १४, १५, व १६ असे अवस्वरू आहेत. ओवी संख्या पुढीलप्रमाणे:– अवस्वरू ३ । ५० ओव्या; ६ । ४८ ते १५७; ७ । १-१५५; ११ । २१ ते १६३; १२ । १ ते २०५ [पूर्ण]; १३ । १ ते २०; ६०–९९; १४७–२१३; १४ । १ ते १३१; १५ । ३६ ते १४२; १६ । १-२७; ११४–१५६. एकूण ओवी संख्या ११००.

शोधाची पूर्वपीठिका

मला या काव्याची माहिती मिळाल्यावर मी शोध केला. त्यावरून **शामराज व कृष्णदास** या नांवाने लिहिणारे अनेक लेखक दिसले. शामराज नामधारी लेखकांची ओळख डॉ. प्रभुदेसाई यांनी करून दिलेली असल्याने त्याची पुनरावृत्ति करीत नाही. कृष्णदासांबद्दलची माहिती पुढीलप्रमाणे–

१. **कृष्णदास** (गोविंद) – १६००–१७३०; स्वत:स अज्ञान कृष्णदास म्हणवितो. गुरुपरंपरा = हरिदास – कान्ह (कृष्ण)– कृष्णदास (कृष्ण)-कृष्णदास (गोविंद), ग्रंथ = बाळक्रीडा, रासक्रीडा, भस्मासुरवध, रुक्मिणी स्वयंवर, अश्वमेघ पर्व, कृष्णजन्म, गरूड गर्व परिहार, शिवरात्रि चरित्र.

२. **कृष्णदास** (दामा)– आदि पर्व.

३. **कृष्णदास** (नामा)– हाच विष्णुदास नामा असे श्री चांदोरकर यांना वाटले.

४. **कृष्णदास पंडित** – कथा सारामृत.

५. **कृष्णमुनि** (डिंभ) – श. १७१६–चेंडुफळी.

६. **कृष्णदास** (मुद्‌गल) : ग्रंथ– रामायण, रुक्मिणी स्वयंवर, कालियामर्दन, अश्वमेध इत्यादि.

७. **कृष्णदास बैरागी**– चतु:श्लोकी भागवतावर रचना.

यांच्याशिवाय कृष्णमूर्ति, कृष्णराज, कृष्णार्णव, कृष्णानंद, कृष्णसुत, कृष्णस्वामि इत्यादि प्रकारे "कृष्ण" नांवाचा उपयोग केलेले लेखक आढळतात. या सर्वाहून **कृष्णदास सामा** निराळा खरा, पण नेमका कोण ?

तपास करता या कृष्णदास सामासंबंधी पूर्वी प्रा. अ. का. प्रियोळकर, व डॉ. पिसुर्लेकर व त्यावरून डॉ. तुळपुळे यांनी महाराष्ट्र सारस्वताच्या नव्या (पुरवणीसह) प्रतीत माहिती दिली आहे. गोव्यातील ख्रिस्ती लोकांनी केलेल्या धार्मिक अत्याचाराबद्दल पूर्वीही लिहिले गेले. डॉ. प्रभुदेसाई यांनी आपल्या लेखांत याच कृतीप्रवृत्तींचा पुनरोल्लेख सविस्तर केला आहे. प्रा. प्रियोळकर यांनी सामाच्या कृष्ण चरित्र कथेच्या या काव्याची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मायक्रो फिल्म सुमारे १०-१५ वर्षापूर्वीच करवून माग-विली होती. पण ती रोमन लिपीत असल्याने व नीट न निघाल्याने अवाच्य व दुर्बोध राहिली. डॉ. पिसुर्लेकर यांनी पूर्वी "भारत मित्रा" त व इतरत्र परिचयात्मक लिहिले होतेच. ब्रागा येथील संग्रहातील रोमन लिपी-तील प्रतीची मायक्रो फिल्म तर त्यांनी केलीच, पण १९ वा अवस्वरू देवनागरीत लिप्यंतरित करून प्रकाशितही केला. ही सगळी पूर्वपीठिका सविस्तर माझ्याजवळ असली तरी या जागी तिची आवश्यकता नाही. डॉ. प्रभु-देसाई यांनी संक्षिप्त परिचय केलेला आहेच. श्री. प्रियोळकर या काव्यग्रंथाला सारस्वतांचा मराठीतील जुन्यात जुना मानतात आणि रोमन लिपीतील प्रत ही ख्रिस्तपुराणकर्ता फादर स्टीफन्स याच्या हस्ताक्षरातील असावी असेही त्यांना वाटते. त्या प्रतीतील पहिल्या सहा पानांचा कांही भाग फाडलेला आहे असे डॉ. पिसुर्लेकर म्हणतात. (**फाडलेला कीं फाटलेला**).

अंतरंग दर्शन

काव्य व कवि यासंबंधी बाह्यपरिचय वर करून दिलेला आहे. थोडा अंतरंग परिचय योग्य ठरेल. डॉ. प्रभुदेसाई यांनी स्थलमर्यादेमुळे ते काम केलेले नाही, त्यामुळे पुनरावृत्तीचे भय तर नाहीच, शिवाय माझ्या प्रतीचा विशेष परिचय होण्याच्या दृष्टीनेही ते इष्टावश्यकच ठरेल.

विषय- हे काव्य श्रीकृष्ण-चरित्रात्मक आहे. मात्र कवीने पूर्व भागच वर्णिला आहे. "आमीं **बालपणाचे या चरित्रांकडे । फुडील ओर्क्षे न घडे ।** वृधीचें मांडवल थोडें । म्हणुव्‌नियां ॥ २६९ । १९ "थोरांचे सभे थोर । तेथें लानांचे न चालती वेव्हार" असे त्याला वाटते. म्हणून त्याने बारास्कंद भागवतातील विख्यात दसमां-तील आदि मध्यें अंतरीं असलेला समस्त कृष्णकथेच्या पंचेचाळीस अध्यायांची टीका संक्षेप करून श्रोत्यांना सांगितली आहे. "सारसार उध्वरूतु । जैसे रत्न घेइजें वेंचुनी । तैसे क्रुस्ट्ण चरित्र काढोनि । केला ग्रंथु ॥२६४॥ अल्पारंभु खेमकरू । बहुत घेतां विस्तारू । ज्ञानाचा सागरू । नासें पाहे ॥ २६५ ॥ मन होईल चंचल । पसरितां वाग्जाळ । म्हणवुनि संखेपें सकळ । सांगितलें ॥ २६६ । १९ ।" आणि फुडील ग्रंथाची टीका । चरित्र वैकुंठ नायका । ते सांगवया सुखा । लागीं ठेविलें ॥ २६७ ॥.

"भागवत पुराणांत जरी परमात्मेयाचे सकळई गुण प्रसन्नपणे विस्तारलें" असले तरी "आपुले मति कांही जर बोलिलें म्हणाल, तरी हें विखीं तुमी ठाई कुसल आसा", हे आश्वासन देत असतां कवीला स्वतःच्या अल्प-मतित्वाची जाणीव आहे. "मुंगियें मेरू उलंडावा । थोरे कष्टें करूनु जीवा । तैसा आमचा रिगावा । कथेलागि." व्यासादिकासारख्या 'समरथाचि बोलणि' ती कसली 'उचलिता' येणार, पण चक्रपाणिची कृपा व 'श्री गुरूनाथु मस्तकि ठेउनिया हातु । हृदयि प्रघटे गभस्ति । ज्ञानरासि" म्हणूनच सेवकाने "उणेपुरे" निरोपिलें ते संता - श्रोत्यांनी अंगिकारावे. मातेप्रमाणे असणाऱ्या "सादुजना" नी कृपावंत होऊन कथेते ऐकावे व खेमा करावी, असे तो विनवितो.

यातील कथा म्हणजे बालक्रीडा, उखलबंधन, अघासुरवध, बकासुरवध, यिद्रयाग व गोवर्धन पर्वत उचलणे; रासक्रीडा, केसीवध, अक्रूरागमन, चाणूर मुष्टिकाशी मल्लयुद्ध, शेवटी कंसवध, व राज्याची व्यवस्था इतका भाग आहे. माझ्या प्रतीत १६ अवस्वरू म्हणजे अक्रुरागमनापर्यंतचा भाग आहे.

निर्मिति हेतु- संपूर्ण कृष्णचरित्र कथा श्रवण, मनन, वाचन केल्याचे फल "श्री भागवत कथा । जेणे तरिजे आइकता । सौंसारू हा ॥१ । १६ ॥ "जे मुक्तीचे बीज । अंतिचें तारक निज । तें सांगितले" "जी जिवांची सोहिरीं । जेणें पाविजे निज मंदिरीं । जेथे पातलेया मागुते संसारी परतणें नाहीं ॥" मुक्त, मुमुक्षु, सौंसारि या त्रिविध नरांनी निरंतर श्रवण करावी, कारण "जेया जो अधिकारू । तरावेया हा सौंसारू । तो येथ प्रकारू । बोलिला असे।"

प्राणिया तारावेया संसारू; नासावेयां अज्ञान अंधकारू; भक्तीचा रसु भागवतांना मिळावा म्हणून; मुक्तीचे बीज व अंतीचे तारक; संसारीं परतणें नाही; सुधी होवावेया चित्ता; इत्यादि साठी हे कथन केले आहे. पसायदानाच्या रूपांत कवी मागतो "नमो यदुकुळ पावना । वासुदेवा ॥ ७ । ७ ॥ देयि तुझि परम भक्ती। श्रवणी आइकिजे कीर्ति । क्रिया घडे पदादिकीं । तुझि सकळ ॥ ८ ॥ वाचे बोलिजे कीर्तन । मनी कीजे ध्यान । नयनी पाहिजे वदन । रूप तुझें ॥ ९ ॥ सिरी किजे नमस्कारू । अइसा भक्तीचा सौंस्कारू । आमा घडे अष्टौ प्रार । तुझि सेवा ॥ १० ॥ इतुकें द्यावें देवे । आमि मागितले आघवे...... ॥ ११ । ७ ॥

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयाची विविधता

मुख्य वर्ण्य विषय श्रीकृष्ण चरित्र कथन असला तरी अधून मधून जागजागी तत्त्वज्ञानात्मक विवेचन आहे. अधे–मधे, जाता जाता कवीने **अनेक विषयांना** हात घातलेला आहे. त्या सर्वांचे स्पष्टीकरण तर असोच, परिचयही देता येणे शक्य नाही इतके ते विविध व विपुल आहेत. निर्देश मात्र करीत आहे.

नामस्मरण सामर्थ्य; परोपकाराचे फळ; भक्तीचे स्वरूप; गृहिणीचे रूप व महत्व; कर्म, ज्ञान याहून भक्ति अधिक त्वरित फलदायि; कर्माचे स्वरूप, प्रक्रिया, परिणाम; कर्मप्रधान त्रिभुवन; सौंसार धर्म हा वैष्णवीयेचा खेळ; कर्माकर्माच्या नाशावाचून परमेश्वर दर्शन असंभव; स्त्रियांचा धर्म; पतिव्रता धर्म, त्याचे इष्टनिष्ट फल; स्त्रियांस उपदेश; गोपींचे भ्रताराविषयीचे तत्त्वज्ञान किंवा दृष्टिकोण (जो वोलिला भ्रतारू। तो शरीर समंधीचे वेव्हारू। तुं आत्मा निर्विकारू। हृदयिचा); संसार; शरीर संबंध; व्यभिचार व्याख्या; शरीर विरूद्ध आत्मा; नश्वर विरूद्ध नित्य चैतन्य, निर्विकार; कनिष्ट श्रेष्ट धर्म (न भजतेयां भजिजे। हा थोरू धर्म बोलिजे। जैसा कृपाळु अपत्यां जाणिजे। माता पिता); सोहिरा कोण (तो सोहिरा म्हणि जति। सर्वाभूति जेया प्रीति। निरपराधिया किजति कृपा जेहि।); जाणून कर्म केल्याने योग्य फळ मिळते; विचारपूर्वक कर्माचे फळ वोखटे पावे; अत्यंत सन्निधान ते अवग्नेसि कारण; अंतरवते तेया सवें। प्रघट जाहलिया आघवे। राहिले प्रेम; दूर राहिल्याने अधिक आठवण, जवळ असल्याने तेवढी नाही; आणिकें केलें नवचें। करणे समर्थाचे म्हणोनु आपणें कांहि त्यांचे घेऊ नये; ईश्वर पुरुषें केले। नकळे कवणा; इत्यादि.

वानगी दाखल दिलेल्या या कांही विषयांच्या जोडीला अनेक विषय आहेत. या सर्वांतून प्रकर्षाने दिसून येणारा एक गुण म्हणजे कवीची **वर्णन शैली**. हे वर्णन करण्याचे त्याचे सामर्थ्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. वर्णनाच्या ओघात त्याने अनेक विषय चपखल, सहजपणे, क्लिष्ट न होऊ देता बसवून दिलेले आहेत. वर्णनाची थोडी वानगी डॉ. प्रभुदेसाई यांनी दिलेली आहेच. अतिशयोक्त वर्णने जागजागी आहेत त्यावरून इतर मराठी आख्यानक कवींच्या अद्भुत, अतिशयोक्त वर्णनांची आठवण येतेच, पण त्याबरोबरच स्वाभाविक, सहज, प्रसादपूर्ण वर्णनेंही सामाने केलेली दिसतात. निसर्ग वर्णनाप्रमाणे युद्धाचे, झुंझीचे, कुस्तीचे, रासाचे, खेळाचे, गोपींचे, श्रीकृष्णाच्या रुपलक्षणेचे इत्यादि अनेक वर्णने मोठी मनोहर आहेत. कंस वधास उद्युक्त कृष्ण प्रत्येकाला स्वभावानुसार कसा वेगवेगळा दिसला ते वाचनीय आहे. (कंसाला काळाप्रमाणे, मल्लांना विशाल वज्राप्रमाणे, पौरजनांना राजाप्रमाणे, स्त्रियांना मदनाप्रमाणे, गोपाळांना स्वजनाप्रमाणे, वसुदेवाला जन्मकाळ नंदनाप्रमाणे, इतर राजांना शत्रू, देवांना विश्वरुप, योग्यांना ध्यान, यादवांना परमगति सुदैवच—वगैरे—१०–१४। १९) श्रीकृष्णाची "रुपलक्षणा" पहा:–

विसाळ हृदय वक्षस्छळ। प्रलंबा वहु विसाळ। श्रवणे कुंडले झळाळा मकराकारें॥ गळां वैजयंति माळा। श्रीवत्स सोभे वक्षस्छळा। कमलासारिखे डोळे। चंद्र वदना॥ वज्र अंकित रेखा। चरणि शोभति सुरेखा ऐसा प्राणाचा सखा। श्रीकृष्ण देवो॥

ही व असली इतर कितीतरी मनोहारी वर्णने उपमा दृष्टान्तांनी, सहज ओघवती, प्रवाही भाषेत नटलेली जागजागी आढळतात.

अलंकार– वर म्हटल्याप्रमाणे कवीने आपल्या प्रतिपादनासाठी उपमा दृष्टान्तादींचाही वापर केलेला आहे. अतिशयोक्ति, उत्प्रेक्षा यांचीही उणीव नाही. वर्णने रसाळपणें करून प्रभावोत्पादक होण्यासाठी आख्यानक कवि अलंकारांचा उपयोग करीत आलेले आहेत. हा वस्तुतः त्यांचा सर्वसामान्यपणे आवश्यकच गुण खरा. तो कृष्णदासातहि आहेच. एकी दाडा आकासीं। एकी पसरिली भुमीसी। मार्गु आणुनु मुखासि। कोंडुनिया ॥ १०२ ॥ मेरू मंदाराचे शिखर। तैसे स्छूळ ज्याचे शरीर। स्पर्धा करी अंवरा–लागोनियां ॥१०३॥७॥" असली अतिशयोक्त, अद्भुत वर्णने आहेत. उपमांची तर रेलचेलच आहे. त्या किती सांगाव्यात. "जैसि पिलेयां पक्षिणी। धरि पोटेसि वेंटाळुनि। तैसे गोळिये चक्रपाणि। रक्षिता होये॥ ९१। १२॥ नेणता सिंहाची थोरी। कोला त्यार्थे पैजा करी। तैसि इंद्राची फरारी। कृष्णा लागि॥ ९७॥ हासउनु गरूडासि। मशक उडाले आकासि। ते वारेयाचे वळसे बुडोनि जाय ॥ ९८। १२॥ तैसे झाले पुरंदरा ...... ॥ प्राणु निगालेंया बाहिरि। पुणुति संचरे शेरिरि। तैसें गोपिका अवस्वरीं। आलें राया॥ ३२॥ ठेवा गेला चडे हाति। तेणे संतोष्रु पाविजे चित्ति। तैसें गोपिका श्रीपति। देखिले या॥ ३३। १४॥ सोवर्ण मणियाचि माळा।

दो मणिया माजि येकु निळा । तैसा गोपिका माजि कृष्णु सावळा । सोभता झाला ॥ ७८ । १४ ॥ (५७ । ७, ५५-५८ । ११, ४८, ९१, ९७-९९, १३९, १४८-१४९ । १२, ९, २०, ७८, ८३, ८४, ९९, १७०-१७१ । १३, ४, ३२, ३३, ६६, ७८, ८४, ८८-९४, १२१-१२२ । १४, १३३ १३१, । १५, १४-१५ । १६, २२ । १६ इत्यादि पहा.) गंगा सागरा मेळु । कि पर्वणि आला पुण्य काळु । तैसा अक्रूरू आणि गोपाळु मिनले दोगै ।। १२१ ॥ नाहि तरि सालिग्राम तुलसी । भेटि झालेया दोगासि । तैसा कृष्णां आणि अक्रुरासि । तेयां वेळि ॥ १२२ । १६ ॥; नामदेवांच्या हिंदी पदाची व मराठी अभंगाची आठवण करून देणारी उपमा-दृष्टांत-वाहुडि मोकळिलि अंबरी । चित्त तेथ हांति दोरी । तैसें ध्यान ठेउनु कृष्णावरि । करिति काम ॥२०॥१३॥ काष्टाचि बाउलि । हाले चालेना वोगुलि । तैंसी गोपिकांची झाली । शरीर गात्रें ॥ ७८ ॥ १३ ॥

रस– आख्यानें रसाळ असली ; विविध रसांचा त्यांत अधूनमधून खेळता वावर असला म्हणजे कथा-नकाची गोडी तर दुणावतेच पण वाचक-श्रोत्याची जिज्ञासा व रुचिही द्विगुणित होते. त्यांना प्रति क्षणि नवनवीन रुचि – गोडी – आस्वाद प्राप्त होत असतो. नवरसांचा वापर व परिपोष म्हणूनच हे आख्यानक कवि करीत आलेले आहेत. नाही तरी "रस आत्मा काव्यस्य" सामाने शृंगारापासून भक्ति, शांत रसापर्यंत वहुतेक सारे रस या काव्यांत हाताळलेले आहेत. "चौदा भुवना जेया उधरीं । तो आमि धरिला स्तनावरि । तरि आमि हचा हौनु थोरि । भाग्यवंता ॥ १६३ । १३ ॥ किंवा कृष्णाचे पाय स्तनावर ठेवू लागल्या– १६ ते ४० । १४, १९९ । १३, इत्यादि उत्तान **शृंगारा** प्रमाणेच **हास्य** (२७।१६), **रौद्र–भयानक**–इंद्राने केलेल्या प्रलय प्रय-त्नाचे रम्य-भीषण वर्णन ५९ व पुढे १२; प्रलय वृष्टीमुळे होणाऱ्या स्वाभाविक क्रियेचे वर्णन ५९ व पुढे । १२ **करुण** (गोपींचा विरह) १६८–१७९; १३ कृष्णाची आठवण काढून गोपींनी केलेल्या कृष्णचरित्राच्या अनु-कृति १८४ व पुढ । १३; **वीर** – युद्धाची, झुंझींची, कुस्त्यांची वर्णने, **अद्‌भुत**; अतिशययोक्त वर्णने, कंसाचा **क्रोध, भक्ति, शांत** इत्यादि रस जागजागी खेळविले आहेत. त्याचे वर्णनकौशल्य रसाचे साह्य मिळून अधि-कच उठावदार व प्रभावी झाले आहे. हे त्याचे गुण विशेषच ख्रिस्ती पाद्रींना हे काव्य विशेष आवडण्यास व त्यांना प्रभावित करण्यास कारणीभूत झाले असावे. नव-रसाबद्दल स्वत: कवीचम्हणतो – मुक्तां कारणें बोलिले ज्ञान । मुमुक्षु भक्ति वैराग्य साधन । श्रृंगारू सौसारिका जना सांगितला ॥ ४ । १३ करुणा जे बोलिलि । ते मक्तांलागि माउलि । **नवरसार्थे प्रसवलि** । कथा सकळ ॥ ५ । १३ ॥. ही त्याची अभिव्यक्ति व विश्वास काव्यवाचनानें प्रत्ययास आल्यावाचून राहत नाही.

भाषा सबंध काव्यात जुन्या भाषेचे स्वरूप दिसते. रोमन लिपीत आलेली मूळ शब्दाची रूपें थोडी फार विकृत झालीत. तीच पुनः मराठीत येताना तशीच विकृत राहिलीत (परमेश्वर = परमेस्पर, श्री = स्त्री, इत्यादि) पण माझ्या देवनागरी प्रतीत असल्या चुका नाहीत. आहेत त्या ग्रांथिक भाषेच्या ऐवजी बोली किंवा व्यवहारातील भाषाच लिपीत वापरण्याच्या प्रयत्नात होणाऱ्याच आहेत. (वछ = वत्स, आकं = ऐक, असृ = अश्रु, यंतुसे = येतसे, पुणुंति = पुनः, अफारू = अपार, पनरावा = पंधरावा, जल्म = जन्म, दोगै. प्रघटे, भर-थवंसी, सटवा = षष्ट = सहावा, अवग्नेसि = अवज्ञेसि, रूसि = ऋषि इत्यादि) वर्णलोप, वर्णवृद्धि, वर्णविप-र्यय हे प्रकार तर बोली भाषेत सर्वसामान्यच. त्यांची उदाहरणे किती द्यावीत. वर्णभेदही जागजागी आहेतच (स च्या जागी श, ख = ष, ख = क्ष, व = अ, घ = द वगैरे.) जुने शब्द व रुपें सर्वत्र दिसतात. (अंतउरी, झोंबति, आरूढपत होंति, तरता पयि, कडगुलि, आप-आपरू, पडिये, वरि ठापिली, संउसार, काति, प्रतेमु, गोंडाळा, पोटळा, वोंबुळा, फुडि, माजैया, ज्याचेनि करूनि लोटुनु, खस्तावस्त, पुणुंति, वोगुलि, नारवापारवा, सोठविति, जुनट, वायाविण, हाथारा, आंगिचडले, ताकपिरें, भज्ञा, खाकाडिति, अवगडे, हौनु, खेळिनला, पुष्पावेला वारा, वोगुलि, दोर्भागिणी, आदि.

विभक्ति प्रत्यय – श्री गुरुनाथु, सुतु, कुमरू इत्यादि उकारान्त (प्रथमा) ; ज्यायें, तुथें, **ता** सोडिले (द्वितीया) ; मुंगियें, वारेन, कुवेरें, त्याहि (तृ.); तिं आइकोनि (तृ.) हौनु, पासउनि (पं.); नंदाचा घरी ; कृष्णाचिये समोरा (ष.) ; मुखार्थे (स.) ; अशी प्रत्यय रूपें दिसतात

माहारे (माघारे) ; वर्तैयिल (वर्तेल) ; डाळि पेटुनु ; घालोनु अग्नि; हातियारू (हत्यार) ; भीयड (भिड), सुवडु ; गर्वली ; तळाथां इत्यादि **शब्दरूपें** आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रावो करी ते राणीव। सुजाणु करी ते जाणीव (१४९।७); जो पैलचायें उपकारू करि। तो वरवे पावे सौंसरि (७०।११); जेया वुद्धिचे डोळे। जितली इंद्रिये सकळे। (५।१२); गुण कर्मांचे फळ। पावे वोखटे सकळ। म्हणौनु विचारू हे मूळ ॥ १७।१२॥ मुळि सिपिलेया टाळी रिघति। अंकुरादिक ॥ ४९। १२; अत्यंत सन्निधान। ते अवग्नेसि कारण ॥७३।१३॥ पाठि घेति इत्यादि **सुभाषितात्मक व वाक्प्रचारात्मक** वाक्येहि दिसतात.

सर्वत्र ओवीच असल्याने वृत्ताबद्दल सध्यातरी विशेष सांगण्यासारखे नाही. अंत्य यमकांचे वंधन सैलपणेच पाळलेले दिसते.

समाज दर्शन

लेखक आपापल्या काळांत वावरतात, त्यामुळे तत्कालिन परिस्थितीचे पडसाद त्यांच्या लिखाणांत कळत नकळत उमटल्याशिवाय राहात नाहीत. प्रस्तुत काव्यातहि असेच झालेले आहे. तत्कालीन प्रातःकाळचे गृह संस्कार; कर्मलोप वर्ण विशेषे भागा आलेली विहित कर्मे, वृति सोडून इतरांचे भजनि लागल्याचे परिणाम; विडे झाले सकळां मंडलिकां (ही पद्धति मूळ कोणाची व केव्हापासूनची, तशीच सामाजिक कीं राजकीय); दिवटिया पंज समोरि लाउनिया। वीर निघाले आपुला; रंगवाटा, अखाडे यांची सजावट; अक्रुराच्या स्वागताच्या निमित्ताने प्रतिबिंबित तत्कालीन आगत स्वगताची सामाजिक पद्धति; त्यांच्यासाठी विश्रांतिची सोय; वोलण्याची रीत; राजा-प्रजा संवंध; और्ध्वदेहिकांदि वर्ण-वैदिकांच्या संस्काराची आवश्यकता, पुत्रधर्म; स्त्री [पतिव्रता] धर्म; गोवर्धनोत्सवाच्या निमित्ताने उत्सवाच्या तयारीचे प्रकार, इत्यादि अनेक प्रकारे समाजजीवनाची व विचारांची-प्रवृत्तीची प्रतिविंवे उमटलेली आहेत.

प्रस्तुत प्रतीचा काळ व महत्व

कागद, शाई, लेखन वाटिका, वर्णांचे रूप, शब्दरूप, भाषेचे स्वरूप, तिचे ग्रांथिकतेपेक्षां व्यावहारिक-वोलभाषेचे स्वरूप, विभक्ति प्रत्ययांची रूपें, उपमा दृष्टांतादि आलंकारिकतेची प्रवृत्ति, वोलभाषेमुळे लेखनांत आलेली विकृतता किंवा प्राकृतता [सुसंस्कारित रूपाऐवजी मूळ प्राकृत रूपांचा वापर], इत्यादि वरून प्रत-लेखकाने ही प्रत तयार करताना वरीच जुनी-मुळ प्रतीच्या अधिक जवळची-प्रतच वापरली असावी असे दिसते. शिवाय त्याने मुळांत वदलही फारसा केला असे दिसत नाही. अधून मधून एकाच शब्दाची किंवा वर्णाची दोन रूपे [शुद्ध वा अशुद्ध :- स = प, ख = क्ष, व - ब इत्यादि] दिसतात खरी. तेवढे वगळले तर अन्य बाबीवरून ही नकल प्रत **तीन - साडेतीनशे वर्षाइतकी जुनी** तर नक्कीच असावी असे अनुमानावयास प्रत्यय नसावा. ही प्रत उत्तर हिंदुस्थानातील भागांत सापडलेली व तीही पेशव्यांच्या सरदारावरोवर उत्तरेस आलेल्या महाराष्ट्रीय कुटुंवापैकीं एकाकडची. त्यामुळे प्रतीचा काळ ठरविणे या आधारावरही थोडे सोपे ठरते. या पोथीची अनुपलब्ध असलेली इतर गहाळ पाने सुदैवाने मिळाली तर!

रोमन लिपीची प्रत कुठल्या व केव्हाच्या मूळ मराठी प्रतीवरून केलेली आहे हे कळले तरी प्रस्तुत देवनागरी प्रतीचा लेखनकाल ठरविणे शक्य होऊ शकेल. लिप्यंतराच्या प्रक्रियेत झालेल्या उणीवा व दोष वगळले तर व फादर स्टीफन्सच्या हातची ही रोमन प्रत मानली तर प्रस्तुत उज्जयिनी-देवनागरी प्रत ही त्याच प्रतीच्या अली-पलीकडची मानता येऊ शकेल. कारण या दोन प्रतीतील प्रमुख रूपांत फार मोठे असे अंतर दिसत नाही. अर्थात हे विधान डॉ. पिसुर्लेकर यांनी प्रकाशित केलेल्या केवळ एकोणिसाव्या अवस्वरूतील रूपांच्या आधारावर केलेले आहे. इतर अवस्वरूतही असेच रूप असणार, वेगळे नसणारच. डॉ. प्रभुदेसाई यांच्या प्रतीतील जो भाग वार्षिकांत उद्धृत झालेला आहे त्यावरून त्या दोन्ही प्रतीत वरेच पाठभेद दिसतात. विशेष तुलनेनंतर काय ते स्पष्ट होईलच.

समारोप

एवं गुण विशिष्ट कृष्णदास सामा याच्या "श्रीकृष्ण चरित्र कथा" या शके १४४८ त लिहिल्या गेलेल्या मराठी रसाळ आख्यानक काव्याच्या, अलीकडे मे १९६७ मचे मला उपलब्ध झालेल्या त्रुटित हस्तलिखित देवनागरी लिपीतील प्रतीचा संक्षिप्त परिचय आहे. बागाची रोमन लिपीतील प्रत जशी अखिल जगांतील एकमेव उपलब्ध प्रत तशीच माझ्या जवळची तेवढीच देवनागरीतील एकमेव प्रत असे मी गेल्या दोन आठवड्यापूर्वी पर्यंत मानून तिच्या पुढील संस्काराची तयारी करीत होतो. एका पंधरवड्यांत माझी गोड निराशा झाली खरी. पण तितकाच आनंद झाला, या काव्याची संपूर्ण देवनागरी प्रत डॉ. प्रभुदेसाई यांना उपलब्ध झाल्यावद्दल. मी केलेली मुद्रण-तयारी आता थोडी थांववावी लागेल. टिपणें व टीपा यांत थोडे परिवर्तन करून प्रत यथाशक्य पूर्णपणे संपादित करणे संभवनीय होणार आहे. अर्थात त्यासाठी किती काळ जाणार असेल तो भरा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संगीताचा प्रसारही केला. आणि यातूनच निरनिराळी घराणी उदय पावली. गुरूशिष्य प्रणाली निर्माण झाली व संगीत शिकणे दुष्प्राप्य झाले. त्याचा मुख्य परिणाम असा झाला की, संगीत हे एक तर अशा घराण्यामध्ये किंवा राजदरबारी किंवा हलक्या प्रतीच्या लोकांमध्येच ऐकू येऊ लागले. मुख्य म्हणजे संगीत हे सामान्य लोकांपासून दूर जाऊन एका विशिष्ट अशिक्षित लोकांची दासी होऊन बसले. मूळ संगीताचा आत्मा नष्ट होऊन ते केवळ मनोरंजनाचे साधन होऊन बसले व संगीताची अध्यात्मिक बैठक पार लयाला गेली.

अशिक्षितपणा, अज्ञान किंवा विद्याचौर्याची वृत्ती यामुळे संगीताला विडम्बनात्मक वळण लागण्याची पाळी आली. शद्बार्थाकडे दुर्लक्ष होऊ लागले व त्यामुळे परंपरागत उत्तम चिजांची देखील चिरफाड होऊ लागली. संगीतातील ही अनवस्था कै. पं. पलुसकर व कै. पं. भातखण्डे या थोर संगीतज्ञांनी आपल्या अथक प्रयत्नांने दूर करून संगीतावर महदुपकार करून ठेवले आहेत. पलुसकरांनी संगीत हे सर्व सामान्यांना उपलब्ध करून देऊन त्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली तर भातखण्डयांनी अनेक ग्रंथ लिहून सुसंबद्ध शास्त्र लिहिले व अमोल चिजांचा संग्रह केला. या दोन्ही संगीतज्ञांचे संगीतात शद्बांचे स्थान असण्याविषयी श्रद्धा होती. त्यांनी अनेक संगीत सम्मेलनातून परिसंवाद घडवून आणले. त्यातील अनेक विषयांबरोबर याही विषयाचा समावेश होता. कै. पं. ओंकारनाथ ठाकूर, कै. पं. गोविंदराव टेम्बे, मरहूम उस्ताद अल्लादियाखाँ याचीही संगीतात शद्बांना महत्व असल्याबद्दल मते प्रसिद्ध आहेत. मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिक व संगीताचे रसग्राही समीक्षक प्रा. ना. सी. फडके यांनी आपल्या 'नादलुब्धाच्या आठवणी' या पुस्तकात उस्ताद अल्लादियाखाँची मुलाखत घेऊन त्यांचे या विषयावबत मत प्रसिद्ध केले आहे, ते जसेच्या तसे उद्‌धृत करीत आहे.

"याबाबतीत मतभेदाला काही जागा आहे असं मला वाटत नाही. मोठमोठ्या कुशल रचनाकारांनी ख्याल बनवले आहेत कशाला? शद्बांकडे दुर्लक्ष करून गायला? छे छे ! असं नाही बाबा. सुंदर सुंदर शद्बार्थानं आणि भावार्थानं भरलेलं ख्याल गाताना त्या अर्थानुसार गायकाचे उच्चार झाले पाहिजेत, तरच त्याची गायकीची करामत पूर्ण होईल. निदान माझ्या गुरूनं मला शिकवलं ते असंच की ख्यालाच्या शद्बाकडे लक्ष दिलं पाहिजे, अर्थाकडे नजर ठेवली पाहिजे." (प्रकरण ७ : पृष्ठ ५०)

महर्षी अल्लादियाखाँ हे शिकलेले नव्हते पण श्रेष्ठ संगीतज्ञ होते. तथापि त्यांचे शद्बाच्या स्थानाविषयीचे मत लक्षात घेण्यासारखे आहे, कारण आजकालचे स्वत:ला सुशिक्षित म्हणवणारे संगीतज्ञ (?) मात्र शद्बांचे ओझे मानून स्वरयुक्त गायकीकडे अधिक लक्ष देतात.

मलाही हे मान्य आहे की, शास्त्रीय गायनात शद्बांपेक्षा स्वरांना अधिक महत्व आहे. पण ज्यांचा शद्बाच्या स्थानालाच मुळी आक्षेप आहे त्यांना माझा विरोध आहे. कारण एकतर मागे म्हटल्याप्रमाणे संगीत आणि साहित्य यांचा पूर्वापार अन्योन्य संबंध आहे. दुसरे म्हणजे संगीताच्या गायन, वादन व नृत्य या तीन उपविभागांमध्ये गायन हे श्रेष्ठ समजले जाते याचे मुख्य कारण गायनात स्वरजनित व शद्बजनित असा दुहेरी आनंद प्राप्त होतो. तिसरे म्हणजे रसोत्पत्ती, भावनाविष्कार, कलात्मक सौंदर्य, कुतूहलजनक वैचित्र्य या सर्व प्रक्रियांची निर्मिती संगीताकडून अपेक्षित आहे ती केवळ स्वराने किंवा शद्बाने किंवा लयीने होत नसून स्वर, शद्ब आणि लय या तिन्हीच्या संयुक्त प्रयोगाने होते. रंजकत्व व सौंदर्याभिव्यक्ती हे संगीताचे जे मुख्य हेतु आहेत ते केवळ एका घटकाने साध्य होत नाहीत. वाद्यसंगीताचा आनंद आपण फार वेळ चाखू शकत नाही हे अनुभवसिद्ध सत्य आहे. वाद्य संगीतात स्वर आणि लय या दोन घटकांचा जास्तीत जास्त चांगल्या रितीने व कलात्मक कौशल्याने उपयोग करूनही ते श्रोत्यांना अधिक वेळपर्यंत रंजित करू शकत नाही याचे मुख्य कारण त्यात असणारा शद्बांचा अभाव ! संगीतातील आनंद हा शद्बातीत असतो असे माणनाऱ्या लोकांना वरील उदाहरण पुरेसे आहे. म्हणून माझ्या मते संगीतात स्वर, लय व शद्ब यांचा योग्य समन्वय केला पाहिजे. गायन हे स्वरप्रणित असले तरी ते शद्बप्रेरित असावे असे मला वाटते. वाद्य संगीतात जर केवळ स्वरांचा आनंद मिळू शकतो तर कंठसंगीतात स्वरांवरोबर शद्बांचा आनंद मिळत असल्यामुळे तो अधिक परिणामकारी ठरतो.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जे लोक शब्दांच्या निरर्थक महत्वाकडे नाके मुरडून पाहतात ते विचारतात की संगीतात शब्दांचे एवढे महत्व आहे तर मग तराण्यासारखा निरर्थक गीतप्रकार संगीतात कसा आला ? या प्रश्नाची चिकित्सा दोन प्रकारे होऊ शकेल. एक म्हणजे तराण्याची निर्मिती कशी झाली व दुसरे म्हणजे तराणा हा निरर्थक गीतप्रकार आहे किंवा कसे ? तराण्याच्या निर्मितीसंबंधी फार जुन्या काळात न शिरता आजच्या प्रचलित तराण्याची उत्पत्ती कशी कशी झाली असेल याची कल्पना करता येते. धृपदगायनानंतर ख्यालाची निर्मिती झाली असेल याची कल्पना करता येते. धृपदगायनानंतर ख्यालाची निर्मिती झाली. व त्याचवेळी वीणा या वाद्यावरून सतार या वाद्याची निर्मिती झाली. आताच्या प्रमाणे त्याही वेळी गायक-वादकांमध्ये स्पर्धा-अर्थात् निरोगी-होती. ख्यालाची निर्मिती झाली तरी धृपद शैलीचा इतका जबरदस्त प्रभाव होता की सुरुवातीचे ख्याल हे धृपदअंगानेच बांधलेले असत. त्याचप्रमाणे सतारीचा बाजही धृपद अंगाचाच होता. तो आजही आहे असे माझे मत आहे कारण धृपद शैलीतील 'नोमथोम' हा आलाप प्रकार सतारीच्या 'आलाप-जोड' प्रमाणेच आहे. प्रत्यक्ष ताल सुरू झाल्यावरही दोन्ही शैलीत लयकारीचे प्रकार आढळून येतात. अशा रितीने सतारवादकांनी धृपद शैलीला तोड म्हणून आपली स्वतंत्र वादनशैली निर्माण केली. नंतर त्यांनी एक पाऊल पुढे टाकून द्रुत गतींचा आविष्कार व 'झाला' या प्रकाराने गायकांवर मात केली, पण गायकही कच्च्या गुरूंचे चेले नव्हते. त्यांनीही तोडीस तोड म्हणून तराण्याची निर्मिती केली. सतारीच्या द्रुतगतीची शैली आणि तराणा शैली यात खूपच साम्य दिसते ते याच कारणामुळे ! दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे तराणा हा निरर्थक गीतप्रकार आहे किंवा कसे ? तराण्यातील शद्ब हे अर्थप्रणित आहेत हे मत आता नव्याने पुढे येत आहे. प्राचीन प्रबंधांमध्ये 'कैवाड' नामक जो प्रबंध होता तो आताच्या तराणा-विशेषतः त्रिवट या गीतप्रकारासारखा होता व त्यातील शद्बाला विशेष अर्थ होता. त्यानंतरच्या व आताच्याही तराण्यातील शद्बांना अर्थ आहे याबद्दलचे संशोधन सुप्रसिद्ध गायक उस्ताद अमीरखाँ करीत आहेत. हे सिद्ध झाले तर तराणा हा प्रकारही अर्थप्रणित गीतप्रकारात मोडू शकेल. पण माझा असा सवाल आहे की शास्त्रीय गायनातील सर्वच गीतप्रकार अर्थप्रणित असावे असा नियम का असावा ? त्यातील काही गीतप्रकार विविधता (Variety) या दृष्टिनेही निर्माण झाले असावेत.

रागदारी संगीतात स्वर हे मुख्य माध्यम आहे याबद्दल दुमत नाही व ते असण्याचे कारणही नाही. अखेर रागदारी संगीत म्हणजे काय ? सर्वसाधारण लोकांची रागदारी संगीताविषयी भलतीच समजूत किंवा भीती आहे ती अनाठायी आहे. कारण रागदारी संगीताचा मुख्य हेतु जनरंजन हा आहे. शास्त्रकारांनी रागाविषयी 'रंजको जनचित्तानाम् स रागः' अशी व्याख्या केली आहे. तेव्हा जनरंजन होणार नसेल तर ते रागदारी संगीतच नव्हे असे कां म्हणू नये ? जनरंजन म्हणजे श्रवण, दृष्टी, वाचन इत्यादि क्रिया घडत असता जो आत्मिक आनंद प्राप्त होतो त्यालाच जनरंजन म्हणावे. रागदारी संगीत समजत नाही अथवा त्यापासून आनंद मिळत नाही असे म्हणणे चूक आहे. फार झाले तर, रागदारी संगीतातील बारकावे, एखाद्या रागाचा आविष्कार करीत असता गायक जो स्वरमाला तयार करीत असतो ती क्रिया वगैरे कळणार नाही. किंबहुना ते ऐकताना कंटाळवाणेही होऊ शकेल. पण त्याचा अंतिम परिणाम जो मानला जातो तो आनंददायक असतो. कोणत्याही गोष्टीविषयी एकतर आवड किंवा त्याविषयी थोडेसे ज्ञान असते. उदाहरणार्थ, फडक्यांच्या-अर्नाळकरांच्या कादंबऱ्या सामान्य माणसाला रंजित करू शकतात. कारण त्याच्या वैचारिक पातळीचा विचार करून व त्याला आवडेल अशा विषयात व समजेल अशा भाषेत लिहिलेल्या असतात. मोठमोठे जाडे साहित्य ग्रंथ त्याला आकलन होत नाही. कारण त्याची वैचारिक पातळी तितकी उच्च नसते. त्याचप्रमाणे रागदारी संगीतातील बारकावे समजण्याकरता त्याच्या 'जानकारी'ची पातळी उंच झाली पाहिजे व ती थोड्याशा अभ्यासाने किंवा बऱ्याचशा श्रवणाने होऊ शकते. म्हणूनच रागदारी संगीताविषयीची भीति व्यर्थ आहे. आणि शिवाय शद्बांच्या माध्यमाने निदान एका घटकाचा तरी आनंद प्राप्त करता येतो. म्हणूनच शद्बांची ही आवश्यकता आहे.

आता शद्बांचे हे महत्व ठरवल्यावर त्यांचे प्रमाण, त्यांचा दर्जा, त्यांचे स्थान वगैरे प्रश्न ओघानेच येतात. शद्बांचे प्रमाण अर्थातच मर्यादित व योग्य असेच पाहिजे. शद्बावडम्बराने संगीताची हानी तर होईलच, शिवाय ते

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हास्यस्पदही ठरेल. शद्बांच्या अतिरेकामुळे रागदारी संगीतात कधीकधी हास्यास्पद प्रकार घडतात. उदाहरणादाखल श्री. रातांजनकरांची खम्बावती रागातील एका चिजेचे शद्ब असे आहेत :

स्थायी : लाज शरम तोको नाही आवे,
अत नीलज डार दीन्ही
मोरी जलकी गगरीया,
निपर निठूर ठठोरी करत नितनित ॥धृ॥

अंतरा : अब ही जाय जसोदा रानी से कह दूंगी,
तोरे ऐसे ढंग,
लाल ग्वाल बाल, ना देखो ऐसे नटखट
नीलज दु्ज्जन तुम्हरे सम ॥१॥

उपरोक्त चिजेत इतके शद्ब आहेत की ती स्वरबद्ध करताना रचनाकाराला जेवढा खटाटोप करावा लागला असेल त्यापेक्षा अधिक ती चीज म्हणणाराला करावा लागतो. ही चीज म्हणत असताना किंचित वैचित्र्य वाटत असले तरी शद्बांच्या अति प्रमाणामुळे स्वरहानी होऊन त्यातील त्यातील आनंद नष्ट होतो. मुख्यतः एखादी सुंदर कल्पना लहानात लहान काव्यात व्यक्त करून ती आकर्षकरित्या स्वरबद्ध करण्यात वाग्गेयकारांची खरी प्रतिभा दिसून येते. या कसोटीतूनच पूर्वीच्या चिजा उत्तम रितीने उतरल्या असल्यामुळे त्या आजही लोकप्रिय आहेत म्हणून शद्बांचे योग्य प्रमाण, कमीत कमी शद्बात जास्तीत जास्त आशय दर्शवणारी सुंदर काव्यकल्पना व तितक्याच प्रमाणाने योग्य राग-तालात स्वरबद्ध करून श्रोत्यांना रंजित व उत्तेजित करील अशी रचना असली तरच ती चिरकाल टिकू शकते.

आतापर्यंत संगीतात शद्बाच्या स्थानाविषयी व महत्वाविषयी चर्चा केली. परंतु रचनेतील दोष, शद्बांचा अर्थ न कळल्यामुळे निर्माण झालेले दोष, चुकीचे शद्बोच्चार वगैरे दोषस्थळे निर्माण झाली आहेत. ती सोदाहरण दर्शवून हा विषय संपवतो.

रचनादोष– काही चिजा अशा रागात निबद्ध केल्या आहेत की त्या चिजेतील शद्बांचा अर्थ रचनाकाराने लक्षात घेतलेला नाही. उदा. मालकौंस रागातील 'नीर भरन मैं तो चली जात हूँ' ही चीज किंवा अडाणा रागातील 'गगरी मोरी भरन नहीं देत' ही चीज घ्या. हे दोन्ही राग मध्यरात्री गायिले जातात. या दोन्ही चिजांमधील शद्बार्थ लक्षात घेतल्यास एक सखी पाणी पाणी भरण्यास नदीवर जात आहे किंवा गेली आहे असे आढळून येते. आता मध्यरात्री 'नीरभरना'साठी कोणी जाईल काय किंवा 'भरन नही देत' अशी तक्रार करील काय हा विचारणीय प्रश्न आहे. त्याचप्रमाणे काव्यातून जशी रसनिष्पत्ती होते तशीच ती रागातूनही होते. काही राग विशिष्ट रसानुकूल आहेत, विशिष्ट प्रकृतीचे आहेत. रागांनाही प्रकृति, रस व स्वभाव आहेत. तेव्हा त्यांच्या या गोष्टी लक्षात घेऊन रचना केली पाहिजे. पण पुष्कळ चिजा अशा आहेत की शद्ब करुणरसप्रधान असतील तर त्यांना शृंगाररसप्रधान व चंचलप्रकृतीच्या रागात निबद्ध करण्यात आले आहे. अशा विसंगती पुष्कळ ठिकाणी दिसून येतात. पण स्थलाभावी उदाहरणे देण्याचा मोह आवरतो. दुसरा महत्वाचा रचनादोष म्हणजे शद्ब किंवा शद्बार्थ पूर्ण व्हावा अशी जेथे अपेक्षा आहे त्या ठिकाणी रचनाकाराने स्वरवाक्ये उगाचाच लांबवून व पर्यायाने शद्बवाक्ये तोडून रचना केल्यामुळे अर्थाचा अनर्थ झालेला आढळून येतो. उदाहरणार्थ दरबारी कानडा रागातील 'मुबारकबादियाँ शादियाँ' या ख्यालात 'मुबारकबा—' इतके म्हटल्यावर स्वरवाक्ये इतकी लांबवली आहेत की शद्बातील राहिलेली- 'दियाँ'ही अक्षरे घेवून शद्बार्थ पूर्ण करण्यास बराच वेळ लागतो. अशी आणखी कितीतरी उदाहरणे आहेत. तसेच एकाच काव्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध (स्थायी आणि अंतरा) भिन्न अर्थी शद्ब असलेल्या काही चिजा स्वरबद्ध करण्यात आल्या आहेत. उदा. नंद रागातील ही चीज :

स्थायी– धनधन भाग नंद को, जिनके घर
आयो श्याम ॥धृ॥

अंतरा– चारो ही वेद पुराण और मुनीजन
न जाने पायो भेद ॥१॥

या चिजेत पूर्वार्ध व उत्तरार्धातील शद्बार्थ भिन्न अर्थी असल्यामुळे मूळ स्वररचना उत्तम असूनही विसंगतीमुळे उत्तम चीज या सदरात मोडणार नाही. अर्थात ही चीज मोडतोडीतून झालेली आहे यात शंका नाही. गुरूच्या विद्याचौर्य या वृत्तीमुळे अथवा अज्ञानामुळे बऱ्याचशा चिजा अर्धवट, विसंगत, अपभ्रष्ट व अशुद्ध स्वरूपात प्रचलित झाल्या, व शद्बाबद्दल अनुत्सुकतेमुळे त्या जशाच्या तशाच राहिल्या.

२. **उच्चारदोष** : पुष्कळशा चिजा शुद्ध स्वरूपात असूनही गायकांची चुकीच्या किंवा अस्पष्ट शद्बोच्चारामुळेही दोष निर्माण झाले आहेत. शद्बोच्चार हा एक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महत्वाचा घटक आहे. स्वरांचा लगाव व ठहराव या या गोष्टींना संगीतात जितके महत्व आहे तितकेच शब्दांचा उच्चार आणि शब्दांची फेक यांनाही आहे. पण आमचे नामांकित व सुशिक्षित गायकदेखील शब्दोच्चार दोषापासून मुक्त नाहीत त्यांचे शब्दोच्चार व त्यातून निघणारे अर्थ पाहिल्यास हसावे की रडावे तेच कळत नाही. काही शेलकी उदाहरणे देतो. मालकौंस रागात 'पग लागन दे महाराज कुंवर' हा ख्याल आहे. गायक बोलआलाप करीत असताना खुशाल 'पगला पगला' असे करीत असतात. त्याचप्रमाणे 'हजरत तुर्क मान' 'हजरत तोरे कमान' म्हणणे, 'सो जानु रे जानु' ऐवजी 'सोजा नुरे जा' म्हणणे, 'हुँ तो जनम ना छांडु' ऐवजी 'हूं तो जनमन छांडू' म्हणणे इत्यादी कितीतरी उच्चार दोषांची उदाहरणे दाखविता येतील. शब्दोच्चाराचे महत्व जुन्या मातब्बर कलावंतांनाही कळले होते, म्हणूनच त्यांनी 'सुघमुद्रा, सुघवानी' याची शिकवण दिली आहे. प्रसन्न चेहरा व शुद्धवाणी हे तर मैफल जिकण्याचे मुख्य सूत्र मानले गेले होते. आता गेल्या कित्येक वर्षापासून संगीत शिकण्याचा सुशिक्षितांचा फार मोठा वर्ग निर्माण झाला आहे. शिवाय निरनिराळ्या संगीत संस्था व महाविद्यालयांमधून स्नातक व स्नातकोत्तर विभागांमध्ये संगीत शिकवले जात आहे. तेव्हा शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, सुशिक्षित कलावंत व वाग्गेयकार या सर्वांनी शब्दांचे महत्व पटवून घेऊन त्याप्रमाणे उपरोक्त दोष दूर करण्याची व परंपरागत चिजांचे शुद्धीकरण करण्याची आता वेळ येऊन ठेपली आहे.

या संपूर्ण विवेचनातून खालील निष्कर्ष काढतो.

१. संगीत आणि साहित्य यांचा आध्यात्मिक, ऐतिहासिक, साहित्यिक आणि सांगीतिक दृष्टींनी फार निकट असा संबध आहे. एवढेच नव्हे तर ती एकाच प्रकृतिची दोन रूपे आहेत. Poetry is a Musical thought; while Music is Poetical theme combined with Musical notes, Rhythem & Poetry itself.

२. संगीत आणि साहित्य यांचा संबंध लक्षात घेता संगीतात शब्दांचे स्थान निश्चित पण मर्यादित प्रमाणात, स्वरांना सहाय्यक व पूरक या नात्याने आहे.

३. स्वर आणि शब्द या दोहोंच्या योगानेच नैसर्गिक रंजकत्व, भावनाविलास, सौंदर्याविष्कार, रसपरिपोष आणि कुतूहलजनक वैचित्र्य या प्रक्रिया घडतात. कलानुभूतितून सौंदर्याभिव्यक्ति हा दोहोंचा स्थायीभाव आहे.

४. स्वरापासून स्वरजनित व शब्दांपासून शब्दजनित आनंद मिळतो व दोहोंच्या सुयोग्य समन्वयामुळे जो आनंद प्राप्त होतो व जी रसनिर्मिती होते ती सर्वश्रेष्ठ होय. 'रसात्मकं काव्यम्' प्रमाणेच 'रसात्मकं संगीतम्' म्हणजे रसनिर्मिती हा दोहोंचा प्रमुख व सामान्य घटक (Common factor) आहे.

५. रागाविष्कार करीत असताना इच्छित परिणाम साधण्याकरता व रसनिष्पत्तीकरता शब्द स्वरांना सहाय्यभूत ठरतात तर काव्यातील आशय व भावना व्यक्त करण्याकरता स्वरांचे माध्यम परिणामकारक ठरते असा हा दोहोंचा अन्यान्य संबंध आहे.

६. संगीताचा आनंद हा कलावंत व श्रोते या दोघांनाही मिळत असतो. कलाकाराला एखादे वेळेस केवळ स्वरांच्या माध्यमाने आनंद प्राप्त होत असेल, पण श्रोत्यांना (सामान्य) आनंद देण्यासाठी स्वरांबरोबर शब्दांचीही जोड आवश्यक आहे.

७. शेवटी, संगीतात प्रथम स्वर, नंतर ताल व नंतर शब्द या क्रमाने महत्व देऊन या तिन्ही घटकांच्या समन्वयातून व प्रयोगातून संगीताचा मूळ हेतु साध्य करता येतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रबंध - पदवी

डॉ. द. भि. कुळकर्णी

एम्. ए. झालेले विद्यार्थी नेहमी आपापल्या प्राध्यापकांना प्रश्न करतात, " सर, आता काय करू ? " या त्यांच्या प्रश्नाला संदर्भ असा असतो की " मी नोकरी शोधू की पीएच्. डी. साठी नाव नोंदवू– शिष्यवृत्ती घेऊ ?" शिष्यवृत्ती मिळविणे म्हणजे घरबसल्या दोन–अडीचशेची नोकरी मिळविणे होय अशा समजुतीने नोकरी करू इच्छिणाऱ्या पण घर आणि गाव सोडू न इच्छिणाऱ्या व्यक्तींना अशा पीएच. डी. च्या शिष्यवृत्तीचे विशेष आकर्षण असते. त्यांत स्त्रियांचा भरणा स्वाभाविकच अधिक असतो. क्वचित बुद्धिमान आणि महत्त्वाकांक्षी तरुणीही शिष्यवृत्तीसाठी आतुर होतात. पण ही ' घरबसल्या ' नोकरी बाहेरच्या नोकरीपेक्षाही अधिक जिकिरीची आहे असे लक्षात येताच अधिकांश स्त्रिया शिष्यवृत्तीचा नाद सोडतात; शिष्यवृत्तीच्या दोन-तीन वर्षांच्या कालावधीत नियोजित संशोधन पूर्ण होणार नाही, पदवी पदरात पडणार नाही, संशोधक पीएच्. डी. वाला वगैरे मान तर एव्हाना आपण मित्र-मंडळीत मिळविलाच आहे. या शिष्यवृत्तीच्या रकमेपेक्षा प्राध्यापकाचा पगार अधिक आहे, पीएच्. डी. ची पदवी आणि पांच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव यांचा व्यवहारी भाव तर समानच आहे इत्यादी अनेक खऱ्याखोट्या समजुतींच्या आहारी जाऊन तरुण अभ्यासकही, आपली महत्त्वाकांक्षा आणि सचोटी बाजूला ठेवून, अर्ध्यातच पीएच्. डी. ची आराधना सोडून देतात.

ही परिस्थिती बदलणे इष्ट असेल तर प्रबंध–पदवी आणि तिच्याशी निगडित सर्वच घटक यांचा आपण आस्थेवाईकपणे फेरविचार केला पाहिजे.

सध्या नागपूर विद्यापीठात मानव्य शाखेत डी. लिट्. आणि पीएच्. डी. असे प्रबंध-पदवीचे दोन प्रकार आहेत. खरे तर डी. लिट्. ही पदवी नसून तो सन्मान आहे. हा सन्मान एका विशिष्ट ग्रंथावर मिळणार नाही, तो एका विशिष्ट विद्याशाखेशी निगडित राहणार नाही आणि त्यासाठी मार्गदर्शक, सत्र–शुल्क, परीक्षा–शुल्क इत्यादी यंत्रणाही असणार नाही. एखाद्या संशोधकाने दीर्घ कालपावेतो विद्याव्यासंग केला, अध्ययन–अध्यापन केले, दर्जेदार ग्रंथसंपत्ती प्रसविली, एखाद्या किंवा अनेक विद्याक्षेत्रांत मौलिक भर घातली तरच डी. लिट्. चा सन्मान त्याला प्राप्त होईल. यातील 'दीर्घ काल', 'दर्जेदार', 'मौलिक' इत्यादी शब्द कायद्याच्या दृष्टीने संदिग्ध ठरतील पण शब्दांचा असा कीस पाडण्यापूर्वी, असा संशोधक विद्यापीठापुढे परीक्षार्थी म्हणून उभा राहत नसतो हे लक्षात ठेवणे बरे. डी. लिट्. हा सन्मान एखाद्या व्यक्तीने विद्यापीठास मागायाचा नसतो तर विद्यापीठानेच तो उचित व्यक्तीस स्वेच्छेने द्यावयाचा असतो. मग वाटल्यास त्यासाठी विद्यापीठाने आपली कायम– तज्ज्ञ–समिती नेमावी. तिने विद्यापीठाच्या अधिकारक्षेत्रातील नामवंत संशोधकांची यादी तयार करावी, औचित्य साधून त्यांना डी. लिट्. च्या सन्मानाने भूषवावे.

आज भारतातील काही राज्यांत, काही भाषांत आणि काही विद्यापीठांत डी. लिट्. हा सन्मान देखील बी. ए.–एम्. ए. या पदव्यांप्रमाणे एक परीक्षा–पदवी होत आहे–हा प्रकार फार सवंग होण्यापूर्वीच आपण सर्वांनी त्याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे; शोभेची उपाधी आणि परीक्षा–पदवी यांच्यापेक्षा भिन्न आणि यांच्या दरम्यान डी. लिट्. चे स्थान आहे, याचे भान आपण सर्वांनीच ठेवले पाहिजे. आंतरभारतीय आणि आंतर-विद्यापीठीय विचार जरा बाजूला ठेवला तरी एकाच विद्यापीठातील दोन 'विषयांच्या संदर्भातही कित्येकदा डी. लिट्. चे स्वरूप भिन्नभिन्न कल्पिले जाते, हा विसंवाद तरी तातडीने दूर होणे जरूर आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डी. लिट्. हा उचित 'सन्मान' असेल तर पीएच्. डी. ही रीतसर 'संशोधन–पदवी' आहे. आवेदन-पत्र, सत्र-शुल्क, परीक्षा–शुल्क, मार्गदर्शक या यंत्रणेत वसून संशोधकास ही पदवी मिळवायची असते. डी. लिट्. सन्मानाप्रमाने इथे संपूर्ण सशोधक डोळघापुढे नसतो, त्याचे समग्र संशोधनकार्य नजरेसमोर नसते. त्याने विशिष्ट विद्याशाखान्तर्गत सादर केलेली विशिष्ट संशोधनकृती, तिचे मूल्य यावर पदवी मिळणे–न मिळणे अवलंबून असते. संशोधनकृतीतील मूळ प्रमेयाचा कस, त्याचा सशोधकाने घेतलेला शोध, त्यासाठी त्याने स्वीकारलेल्या विविध अभ्यासपद्धती, त्यातून दिसून येणारी प्रबंधलेखकाची साधनाश्रयी आणि वैचारिक शिस्त, आणि मुख्य म्हणजे प्रबंधातील पुराव्यांची आणि विचारांची मौलिकता–नवीनता यावर अशा प्रबंधाचे मूल्य अवलंबून असते. एखाद्या प्रबंधात संशोधनाची शिस्त काटेतोल असेल पण पुराव्यांची आणि विचारांची मौलिकता नसेल तर तो प्रबंध पीएच्. डी. पदवीसाठी पात्र ठरणार नाही.

मात्र अशा प्रबंधासाठी एक वेगळी पदवी अवश्य हवी. तिला एम्. लिट् किंवा तत्सम दुसरे एखादे नाव देता येईल. तिचा दर्जा एम्. ए. आणि पीएच् डी. यांच्या दरम्यानचा राहील. कालच एम्. ए. झालेले विद्यार्थी जेव्हा पीएच्. डी. ची भाषा बोलू लागतात तेव्हा त्यांचा आजच हिरमोड करावा की उद्या त्यांचा अपेक्षाभग होऊ द्यावा या विचाराने मार्गदर्शक अस्वस्थ होतो त्यावर ही दरम्यानची पदवी हा एक चांगला उतारा आहे.

—आजचा एम्. ए. चा अभ्यासक्रम असा आहे की त्यात प्रबंधलेखनाची पूर्वतयारी अजिबात होत नाही; एम्. ए. आणि पीएच्. डी. यांच्यांत स्वरूप आणि दर्जा यांचे एवढे अंतर आहे की ते शक्यही नाही. ही पूर्वतयारी एम्. लिट्. सारख्या पीएच्. डी पूर्व प्रबंधपदवीद्वारे साधता येईल. या पीएच्. डी. पूर्व प्रबंधलेखनात पुरावे आणि विचार यांच्या मौलिकतेपेक्षा 'संशोधनाची शिस्त' या गुणाची अधिक परीक्षा घेतली जाईल.

एम्. ए. आणि पीएच्. डी. यांच्या दरम्यान एक संशोधनपदवी निर्माण करूनच भागणार नाही. एम्. ए. च्या अभ्यासक्रमातही या दृष्टीने काही बदल करावे लागतील. एम्. ए च्या अभ्यासक्रमात एक संशोधनशास्त्राची पत्रिका ठेवावी लागेल. त्या पत्रिकेच्या द्वारे विद्यार्थ्यांना संशोधनशास्त्राचे शिक्षण द्यावे लागेल, त्यांच्याकडून शोध–निबंध लिहून घ्यावे लागतील.

आज एम् ए. ते पीएच् डी. हे अधन हनुमान उड्डाण करूनच साधावे लागते. प्रबंध–पदवी आणि तिच्याशी संबंधित इतर घटक यांचा आपण असा फेरविचार केला तर या पुढील संशोधकांवर तशी पाळी येणार नाही. (१) एम्. ए. ची संशोधनशास्त्र-पत्रिका (२) पीएच्. डी. पूर्व प्रबंध–पदवी (३) पीएच्. डी. (४) डी. लिट. असे हे रीतसर 'सेतूबंधन' तयार होईल.

या संदर्भात आणखी एक विचार मांडावयास हवा. परवापर्यंत उच्च शिक्षणाकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अतिशय मर्यादित होती. शिवाय त्यांचा सांस्कृतिक वारसा जवळजवळ समान होता. आज उच्च शिक्षणाकडे येणाऱ्या विध्यार्थांची संख्या खूपच वाढली आहे. समाजाच्या अगदी वेगवेगळ्या थरांतून हे विद्यार्थी येत असल्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक वारसातही खूपच विविधता आहे. या सर्वांना योग्य मार्गदर्शन आणि न्याय मिळण्याच्या दृष्टीनेही हे सेतूबंधन आज आवश्यक झाले आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाराष्ट्र राज्याच्या श्वेतपत्रिकेंतील भाषाविषयक धोरण

श्वेतपत्रिकेत नमूद केलेली भाषाविषयक धोरणाची सूत्रे (२.४ अ ते ग) मराठी भाषेच्या विकासाला, प्रसाराला व प्रतिष्ठेला पोषक नसून उलट मारक ठरणारी आहेत. इंग्रजीचे दास्य, हिन्दीचे वर्चस्व व भाषिक अल्पसंख्यांकांविषयीचा अनाकलनीय, अनाठायी आणि अतिरिक्त कळवळा या तीन गोष्टींचा प्रभाव या 'मसुद्या' वर स्पष्ट दिसतो. अ, ब, क या तीन सूत्रांचा एकत्र विचार केला तर मराठी मातृभाषा नसणाऱ्या मुलांना ७ व्या इयत्तेपर्यंतही प्रादेशिक भाषा म्हणून मराठीचा अभ्यास अनिवार्यपणे करावा लागणार नाही हे स्पष्ट होते. उलट ५ वी पासून हिन्दीचा अभ्यास मात्र सक्तीचा होईल. 'ड' या सूत्रात 'फक्त दोन भाषांचे अध्ययन इयत्ता ११ व १२ मध्ये आवश्यक असेल' असे म्हटले आहे. पण या दोन भाषा कोणत्या हे स्पष्ट केले नाही. म्हणजे १२ वी पर्यंतही प्रादेशिक भाषा म्हणून मराठीचे अध्ययन प्रदेशातील सर्व मुलांना आवश्यक राहणार नाही. सूत्र 'फ' प्रमाणे उच्च शिक्षणातही मराठीचे अध्ययन कोणालाच अनिवार्य राहणार नाही. आणि 'ग' सूत्रात तर 'मातृभाषा' असा संदिग्ध शब्द वापरून शिवाय तिची सांगड संस्कृतशी घालून, पुन्हा तिलाही हिन्दीचा विकल्प ठेवून प्रादेशिक भाषा जी मराठी तिच्या उच्चाटणाची पूर्ण सोय करून ठेवली आहे. या सूत्राने तर संस्कृतचाही गळा आवळून टाकला आहे. एकंदरीने या सूत्रांमधून सुसूत्र असे कोणतेही भाषाविषयक धोरण प्रगट होत नाही. मराठीला तर ते सर्वस्वी बाधक होणारे आहे. अल्पसंख्यांकांच्या भाषांना मात्र अवास्तव उत्तेजन या धोरणा [?] मुळे मिळणार आहे आणि भाषेचाच नव्हे तर सामाजिक एकात्मतेचाही विचका होण्याचा संभव आहे.

'फ' मध्ये 'प्रादेशिक' भाषेचा विकास करून विद्यापीठीय शिक्षणाच्या स्तरावर सर्वसाधारण माध्यम म्हणून तिचा अंगिकार केला जाईल, असे म्हटले आहे. ही भाषा फारच दिरंगाईची शिवाय भोंगळ आहे. या सूत्रात सद्यःस्थिती देखील लक्षात घेतलेली नाही. नागपूर विद्यापीठात १९५२ सालापासून कला व वाणिज्य विभागासाठी मराठीचा माध्यम म्हणून स्वीकार केलेला असून इंग्रजी माध्यम नाममात्र राहिले आहे. अलीकडे तर या दोन शाखांत पदव्युत्तर शिक्षण देखील मराठी माध्यमातून सुरू झाले आहे. माध्यम म्हणून मराठीचा विकास अजून व्हावयाचा आहे, करावा लागेल. इतर ज्ञानशाखांतही तिचा वापर सुरू करावा लागेल. पण त्यासाठी निश्चय पाहिजे. निश्चितपणा पाहिजे. सूत्रात नेमके तेच नाही. पुन्हा येथेही 'भाषिक अल्पसंख्यांकांच्या हिताचे भूत' मानेवर 'सवार' झालेले आहेच.

२.५ मध्ये मराठी भाषेच्या विकासाचे जे आश्वासन दिले आहे त्यातही निर्धार वा निश्चिती नाही. शिवाय आज माध्यम म्हणून मराठीचा जो वापर सुरू आहे त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे.

राज्यकारभारात मराठीचा वापर करण्यासंबंधी व त्या दृष्टीने तिचा विकास करण्यासंबंधी श्वेतपत्रिकेत चकार शब्दही नाही.

एकंदरीने हे भाषाविषयक धोरण प्रगतिकारक नसून परागती करणारे आहे. मराठीच्या विकासाचे पोकळ आश्वासन यात आहे पण विविध सूत्रे त्या विकासाला पायबंद घालणारी आहेत. श्वेतपत्रिकेची भाषाही शुद्ध मराठी नाही यापरते दुर्दैव कोणते ?

—प्रा. श्री. मा. कुळकर्णी

* * * *

श्वेतपत्रिकेच्या २.४ छेदकामध्ये संस्कृताचा हिंदी अथवा मातृभाषेबरोबर संयुक्त अभ्यासक्रम सूचित केला आहे. तो ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी असा एकूण सहा वर्षांचा असावा व तो २.४ व व क या छेदकातील भाषांऐवजी वैकल्पित अभ्यासक्रम म्हणून नमूद केला जावा.

२.४ ड या श्वेतपत्रिकेच्या छेदकामध्ये इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये दोन भाषांचे अध्ययन आवश्यक मानले आहे. त्या दोन भाषांपैकी एक भाषा संस्कृत असणे अत्यंत आवश्यक आहे.

विदर्भात गणित–विज्ञान विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्कृत हा ऐच्छिक विषय म्हणून देखील घेता येत नाही. पश्चिम महाराष्ट्रात ही अडचण नाही. एकाच

[पान ८८ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक परीक्षण :

अंधारयात्रा

अलीकडचा कोणताही समीक्षाग्रंथ अुघडताना मनात अेकप्रकारची साशंकता असते. हमखास झोप येण्याचे अेक साधन म्हणजे शास्त्रीय ग्रंथांचे वाचन असे कित्येक वर्षांपूर्वी श्रीपाद कृष्णांनी लिहून ठेविले आहे. आज त्यात मराठीत प्रत्यही प्रसिद्ध होणाऱ्या नवनवीन समीक्षाग्रंथांची भर घालावी लागेल. दुर्बोध, क्लीष्ट, कंटाळवाणे विवेचन हे असल्या समीक्षाग्रंथांचे व्यवच्छेदक लक्षण असते. 'अंधारयात्रा' हा समीक्षाग्रंथ हाती घेतला तेव्हा मनात अशीच पूर्वग्रहांची कोळिष्टके जमली होती. अगोदर मुखपृष्ठ पाहूनच ग्रंथ वाचण्याचा अर्धा अुत्साह गेला. पुढे प्रस्तावना वाचायला घेतली तर तीत काव्यात्म दुर्बोधतेचे समर्थन! आता ग्रंथातील मजकुराच्या संभाव्य क्लीष्टपणाबद्दल खात्री पटली. तरीही हिय्या करून 'अंधारयात्रे'ला निघालो. आणि जसजशी वाट चालू लागलो तसतसे पूर्वग्रह निवळू लागले, अंदाज खोटे पडू लागले. 'अंधारयात्रा' संपविली ती मनात अेक नवा प्रकाश पाडूनच! ....

त्र्यं. वि. सरदेशमुखांच्या या समीक्षाग्रंथाचे दोन भाग आहेत. पहिल्यात मराठीतील केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज आणि मर्ढेकर या फार मोठ्या योग्यतेच्या कवींच्या काव्य कृतींचे सदृदय सविस्तर परीक्षण अेका विशिष्ट भूमिकेतून केले आहे. आणि दुसऱ्या भागात काव्य या कला–वाङमय प्रकाराचा–त्याच्या घटनेचा सखोल अभ्यासपूर्ण विचार केला आहे. दोन्ही भाग अेकमेकाला पूरक आहेत. आणि समीक्षकाचे काव्यविषयक समग्र भूमिका विशद करतात.

'कोसळते आभाळ' या लेखात केसवसुतांच्या काव्य वैशिष्ट्यांचा नव्याने परिचय करून दिला आहे. त्यातील परिभाषा नवीन असली तरी बहुतेक मुद्दे जुनेच आहेत आणि वादातीत आहेत. 'पंखातला काळोख' हा बालकवींच्या कवितेवरील लेख. 'बालकवींचे काव्य' म्हणजे चांदणे, मंद वाऱ्याच्या झुळकी, तारका व हिरवळ....' येवढेच सांगणारे टीकाकार (पृ. २४) बालकवींच्या काव्याची व्याप्ती कमी करतात असे सरदेशमुखांचे म्हणणे. कारण कविता ही केवळ सौंदर्यमूर्ती नसून जीवनावरील भाष्य असते.' (पृ. २४) याचा त्यांना कधीही विसर पडलेला नाही.

बालकवीवरील समीक्षण वाचत असताना सरदेशमुखांच्या प्रतिपादनशैलीचा अेक दोष लक्षात येतो. बालकवींच्या काव्याचे समीक्षण करीत असताना मध्येच सावरकरांचा अुल्लेख येतो. हा अुल्लेख नुसता डोकावून गेला असता तर हरकत नव्हती. पण पाच मिनिटे म्हणून 'बसायला' येणाऱ्या शेजारणीने तासन् तास झाले तरी अुठू नये तसे काहीतरी सरदेशमुखांच्या या विवेचनात होते. आणि विवेचनाचे मूळ सूत्र सुटल्यासारखे होते. हे एकदम शिरलेले सावरकरांवरील विवेचनही सलग होत नाही पुन्हा लेखकाला बालकवी आठवतात. म्हणजे वाचकाला सावरकर पूर्ण विसरून—की एवढी लांबण लागल्यावर जे विसरायला त्रास पडतो-पुन्हा बालकवींच्या विवेचनाला घट्ट पकडून ठेवावे लागते. पण एवढ्यात मर्ढेकरांवरील विवेचन जोर करते. लेखकाचा हेतू 'तुलना करणे' हा उघड आहे. पण प्रत्यक्षात एकाच लेखात बालकवी, सावरकर, मर्ढेकर असा गुंता होतो.

'काळोखातल्या अेकांता'त (पृ. ४२) गोविंदाग्रजांची कविता सरदेशमुख उलगडून दाखवितात. हो! कविता देखील उलगडून दाखविता येते त्रिविध प्रकारांनी कोणीकोणी गुंडाळलेल्या वळकटीला बेदरकारपणे लाथ मारून एका दमात ती उलगडावी तशी कविता उलगडतात. तर कोणीकोणी हलक्या हाताने आणि व्यवस्थितपणे. सरदेशमुख दुसऱ्या प्रकाराने कविता उलगडतात आणि आतील चीजवस्तू नीटनेटकेपणाने मांडून दाखवितात. ह्या चीजवस्तूत, "ज्याचा जो जीवनानुभव त्याची ती जीवनदृष्टी, जीवनाविषयीच्या कवीच्या अनुभवकल्पनेसूनच त्याची कविता रूप घेत असते." (पृ. ४५) असे एखादे प्रत्ययकारी विधान असते.

अंधारयात्रा– त्र्यं. वि. सरदेशमुख, प्रकाशक– वि. पु. भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४, पृष्ठे २२५ किंमत आठ रुपये.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नवा आक्रांत' या लेखात लेखकाचा मर्ढेकर समजून घेण्याचा प्रयत्न आहे. समजून घेताना मर्ढेकर अनेकवार खोडूनही काढले आहेत. उदा. " वाङमयाचा सौंदर्य-शास्त्राशी फार सनातन संबंध आहे. " या मर्ढेकरांच्या विधानाला ते प्रतिवार करतात 'वाङमयाचा सौंदर्याशी असेल त्याच्या शतांशानेही सौंदर्यशास्त्राशी संबंध असेल असे वाटत नाही." (पृ. ८६) मर्ढेकरांच्या काव्यकृतीत आणि समीक्षादृष्टीत प्रचंड पुःसाध्य तफावत या तीक्ष्ण दृष्टीच्या समीक्षकाला जाणवते. (पृ. ८८)

' अंधारयात्रा ' लेखातील मुख्य प्रमेयाचा थोडक्यात परिचय, " अंधारयात्रा म्हणजे जीवीतात अनुभवास आलेल्या विविध दुःखांचे आणि तत्संबंधी प्रतिक्रीयांचे काव्यातील आविष्करण " असा करून देता येईल. काव्यातील या वेदनेकडे पाहाण्याची ' वास्तवसत्याच्या जाणिवेचे एक गुणविशिष्ट शब्दरूप ' (पृ. १३८) ही जी लेखकाची भूमिका आहे ती या समीक्षाग्रंथाची एक जमेची बाजू आहे. कारण यात पलायनवादाचा गर्भित निषेध आणि वास्तववादाचा पाठपुरावा आढळतो.

" जीवनावरचे भाष्य " ही काव्याकडे पाहण्याची लेखकाची भूमिका असल्याचे पहिल्या भागावरून दिसून येते. परंतु वाङ्मयाकडे पाहण्याची त्याची आणखीही एक भूमिका आहे की काय असे वाटू लागते–जेंव्हा 'कला ही जीवनाची दासी (किंवा फार तर, सखी) नाही काय ?', "ललित वाङ्मयांत सामाजिक प्रबोधन होते काय?" असल्या प्रश्नांवर 'नष्टसंदर्भ आणि बटबटीत' असा शिक्का लेखक मारतो तेंव्हा–! वास्तविक या पुस्तकातील एकूण विवेचनावरून कलेकरिता कला किंवा सौंदर्यवादी विचारसरणीचा निषेधच लेखकाला अभिप्रेत आहे हे स्पष्ट आहे. परंतु असे असूनही उपरोल्लेखित प्रश्नांवर ' नष्टसंदर्भ आणि बटबटीत ' असे शिक्के का ? जीवनवादी समीक्षक उघडपणे म्हणवून घेण्याची भीती तर त्याच्या मुळाशी नाही ?

'कवितेतील नवता', 'कवितेची वधशक्ती', 'कवितेतील वास्तव' आदीं लेखांमधून काव्याची जी वैशिष्टये सांगितली आहेत तो विस्ताराने पाहणे येथे शक्य नाही. ती सगळी लेखकाच्या सखोल चिंतनाची द्योतक आहेत.

एकंदरीत ही 'अंधारयात्रा' कंटाळवाणी मुळीच नाही. समीक्षारूपी या यात्रेमधून काही सामान्य (ज्या प्रत्येक समीक्षायात्रेत म्हणजे समीक्षा ग्रंथात आढळतात) गोष्टी आढळतात तसेच आजपर्यंत न पाहिलेली काही विचार-स्थळेही आढळतात आणि ही स्थळे मन सुखावतात हे विशेष.

– स.वि.जोग

महाराष्ट्र राज्याच्या ... [पान ८६ वरुन]

राज्यात हा भेद नसावा. तो नाहीसा करण्यासाठी ८ वी ते १२ वी पर्यंत केवळ संस्कृत विषयाचा विशेष अभ्यास-क्रम आखण्यात यावा व तो वैकल्पिक विषय म्हणून कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्याला घेण्याची अनुमति असावी.

श्वेतपत्रिकेत संस्कृत अध्ययनास उत्तेजन देण्याचा आपला उद्देश महाराष्ट्र शासनाने उद्घोषिला आहे हे उत्तेजन पुढील प्रकारे देण्याची व्यवस्था व्हावी.

१) स्नातकोत्तर विभागात संस्कृत विषय घेऊन अभ्यास करणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यास (सरकारी पद्धतीचा जातिभेद बाजूस सारून) आर्थिक साहाय्य किंवा निःशुल्क शिक्षण मिळण्याची शासकीय व्यवस्था असावी.

२) केन्द्र शासनातर्फे संस्कृतच्या उत्तेजनासाठी ज्या काही योजना आखण्यात आल्या आहेत त्या सर्व राज्यीय स्तरावर अंमलात आणण्याची व्यवस्था व्हावी.

३) ज्या महाविद्यालयात संस्कृत–तत्वज्ञान व इतिहास यासारखे राष्ट्रीय महत्वाचे विषय शिकविण्याची व्यवस्था नसेल त्याचे अनुदान बंद करावे. महाविद्यालयांचा किफायतशीर धंदा चालविणाऱ्या समित्यांच्या संस्कृतादि विरहित शिक्षण संस्थांना मान्यता मिळता कामा नये.

१४–७–६८ **श्री. भा. वर्णेकर**

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी समीक्षेचा विकास :

अव्वल इंग्रजी कालखंड

डॉ. अ. ना. देशपांडे

मराठीत समीक्षावाङ्मयाचा उगद्म आणि विकास या विषयाचा विचार करताना प्राचीन मराठीतही समीक्षा आहे. प्राचीन मराठी वाङमय निर्माण होत असताना त्या त्या निर्मात्यांनी काही विशिष्ट वाङ्मयीन मूल्यं प्रमाणभूत मानलेली आहेत. त्यामुळे मराठी समीक्षेचा उगम शोधताना, मराठीतील वाङमयविषयक विचाराच्या विकासात जे निरनिराळे टप्पे आढळतात त्यांचा आढावा घेताना प्राचीन मराठीतील वाङमयसृष्टीचे अवलोकन करणं हे आवश्यक वाटण्यासारखं आहे. तरीही पण मराठी समीक्षेच्या उगमाचा आणि विकासाचा विचार करताना माझ्या भाषणात प्राचीन मराठीला बाजूलाच ठेवण्यात येणार आहे. आणि तसं करणं एक प्रकारे संयुक्तीकही आहे. वाङमयाची एक स्वतंत्र व महत्वपूर्ण शाखा, असं स्थान प्राचीन मराठीत समीक्षेला, साहित्य शास्त्रीय विचाराला कुठं मिळालेलं आहे ? तसा डौल तिला इंग्रजी वाङमयाशी संपर्क आल्यानंतरच प्राप्त झालेला आहे. त्यामुळं मराठी समीक्षेच्या परामर्षाला अव्वल इंग्रजीपासून प्रारंभ करणं युक्तिसंमत आहे.

इस. १८१८ मध्ये महाराष्ट्राला राजकीय पारतंत्र्याचं ग्रहण लागलं. इंग्राजांची परकीय राजवट सुरू झाली. इंग्रजाचं आक्रमण हे केवळ राजकीय नव्हतं. ते सांस्कृतिकही होतं. इंग्रजी राज्यव्यवस्था सुरू झाली. इंग्रजी शिक्षण सुरू झालं. त्या शिक्षणातून हळूहळू इंग्रजी वाङमयाचा आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा सुशिक्षित मराठी माणसाला परिचय होऊ लागला. मराठी माणसाजवळ स्वतःचं असं सांस्कृतिक धन होतच, त्या धनाचा त्याला अभिमानही होता, तरीही पण इंग्रजी शिक्षणातून त्याला जो पश्चिमेकडचा नवा सांस्कृतिक प्रकाश दिसला तो त्याला अधिक आकर्षक वाटला. पुष्कळदा तो अनुकरणीयही वाटला. कित्येकांचे तर या प्रकाशानं डोळेच दिपून गेले. त्यांना या नव्या प्रकाशस्रोताच्या झगझगाटात आपले आचारविचार तुच्छ, तिरस्करणीय आणि त्याज्य वाटू लागले. पश्चिम त्यांची प्रेयसी बनली. तिच्या अनुकरणात आणि अनुनयात त्यांना आपल्या आयुष्याचं सार्थक झाल्यासारखं वाटू लागलं. ही बौद्धिक शरणागती वस्तुतः वाईटच. पण तिलाही चांगली फळं आली. पश्चिमेचा आपल्या संस्कृतीला झालेला संपर्क हा एकंदरीत लाभदायकच ठरला. संस्कृतींच्या या संघर्षातून आणि समन्वयातून आपला परंपरेचा अभिमान उफाळून आला. आपलं जे जुनं ते जपलं पाहिजे, जोपासलं पाहिजे अशी त्याच्यावद्दलची आस्थाबुद्धी उत्पन्न झाली. त्याचबरोबर इंग्रजी विद्येत आणि इंग्रजी संस्कृतीत जे चांगलं असेल ते स्वीकारून आपण आपलं जीवन समृद्ध केले पाहिजे, वैचारिकदृष्ट्या आपण अद्यावत बनलं पाहिजे अशीही ईर्ष्या महाराष्ट्रीय सुशिक्षिताच्या मनात उत्पन्न झाली. ही प्रवृत्ती जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत कार्यक्षम झाली तशी ती वाङमयात आणि वाङमयसमीक्षेतही झाली.

आधुनिक मराठीतलं सुरवातीचं सगळं समीक्षाशास्त्र हे संस्कृतच्या आश्रयानं निर्माण झालेलं आहे. संस्कृतात जो रसविचार आहे आणि अलंकारविचार आहे त्याची ओळख करून देणारी काही महत्त्वाची साहित्यशास्त्रीय पुस्तके १८१८ ते १८८५ या सुरुवातीच्या अव्वल इंग्रजी कालखंडात लिहिण्यात आली. कृष्णशास्त्री र.जवाडे यांनी १८५३ मध्ये लिहिलेलं अलंकारविवेक हे पुस्तक म्हणजे त्या दिशेनं केलेला पहिला प्रयत्न. यातला अलंकारविचार मुख्यत: मम्मटातून घेतलेला आहे. विवेचन असं या पुस्तकात नाहीच त्या मानानं दाजी शिवाजी प्रधान यांचा १८६८ मधला "रसमाधव" हा ग्रंथ चांग-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लाच भरदार आहे. हा ग्रंथ रचताना लेखकान मुख्यत: भानुदासांच्या रसतरंगिणीचा आधार घेतलेला आहे. रसविचाराची मराठीतून सविस्तर, सोदाहरण ओळख करून देणारा पहिला ग्रंथ म्हणून "रसमाधवा" चे महत्व निस्संशय अनन्य आहे.

संस्कृतातील साहित्यशास्त्रीय विचार मराठीत आणण्याचे जे प्रयत्न या कालखंडात झाले त्यात गणेशशास्त्री लेले यांनी १८६२ मध्ये लिहिलेलं "साहित्यशास्त्र" हे पुस्तकही महत्वाचे आहे. काव्याच्या सर्व अंगाची लक्षण आणि उदाहरण यात दिलेली आहेत. पुस्तक प्रश्नोत्तर पद्धतीनं लिहिलेलं आहे. स्वतंत्र विवेचन, असे त्यात काहीच नाही.

संस्कृतातील साहित्यविचाराचा परिचय करून दिला जात असताना त्याच्याही आधी म्हणजे इ. स. १८५१ मध्ये लोकहितवादींनी " आपल्या शब्दालंकार " या छोट्याशा पुस्तकातून इंग्रजीमधील अलंकार चर्चेची आणि त्यातील शब्दालंकाराची थोडक्यात माहिती करून दिली आहे.

अलंकारविवेक, रसमाधव, साहित्यशास्त्र या पुस्तकातून समीक्षेचं केवळ तात्विक विवरण आहे. समीक्षेचं गौरवार्ह प्रात्यक्षिक अस ज्यांना म्हणता येईल असे दोन महत्वाचे ग्रंथ या अव्वल इंग्रजी कालखंडात रचण्यात आले आहेत. " यशोधा पांडुरंगी " आणि "केकादर्श" हे ते दोन ग्रंथ मोरोपंताच्या केकावलीवरील टीका, असं या दोन्हीग्रंथाचं स्वरूप. यापैकी "यशोदा पांडुरंगी" हा टीकाग्रंथ व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनी इ. स. १८६५ मध्ये रचलेला-त्याकाळच्या अपेक्षेनं ही निश्चित सर्वांगसुंदर टीका. आजचा विदग्ध रसिकसुद्धा ती आपली पसंतीप्रदर्शक मान डोलवील एवढा तिच्या सामर्थ्याचा आवाका. केकावलीतील अर्थसौन्दर्याचं सविस्तर विवेचन दादोबांनी या टीकाग्रंथात मोठ्या पांडित्यपूर्ण आणि प्रौढरीतीनं केलेलं आहे. हा टीकाग्रंथ वाचून मनात एक उत्साहपूर्ण विचार चमकून जातो. मराठीचा इंग्रजीशी संपर्क आलाच नसता तरीही मराठीतील इतर वाङ्मयप्रकारांप्रमाणे मराठीतील समीक्षावाङ्मयही स्वतंत्र पण समृद्ध झालं असतं. योग्यदिशेनं विकसित झालं असतं असं दादोबांच्या "यशोदा पांडुरंगी" कडं पाहून म्हणावसं वाटतं. दादोबांनी या टीकेला जी मराठी प्रस्तावना जोडलेली आहे तिच्यातील काव्यचर्चाही बोधप्रद पांडित्यपूर्ण आणि रसिकतेनं संपन्न अशी आहे.

"केकादर्श" ही केकावलीवरची दुसरी टीका नवनीप्रवाह म्हणून प्रसिद्ध असलेले परशुरामपंत तात्या गोडबोले यांनी सन १८६७ मध्ये रचलेली आहे. श्लोकार्थाचा स्पष्टीकरणापुरतीच ही टीका मर्यादित आहे. तिच्यात रसग्रहण नाही किंवा अलंकारही अंगाच विवेचनही नाही. संस्कृतमध्ये विशेष गती नसलेल्या वाचकाला केकावलीचा अर्थ समजण्यास मदत करावी एवढाच मर्यादित हेतू ठेवून ही टीका लिहिलेली आहे आणि तो हेतू सफल झालेला आहे.

इंग्रजीच्या संपर्कामुळे या अव्वल इंग्रजी कालखंडात आंग्लशिक्षितामार्फत वाङमयसमीक्षाविषयक नव्या विचारांची लागवड होऊ लागली. या बाबतीत पहिली महत्वाची कामगिरी "राजा शिवाजी" या काव्याचे कर्ते श्री. कुंटे यांची. त्यांनी आपल्या या काव्याला दीर्घ प्रस्तावना जोडलेली आहे, पण ती इंग्रजीत आहे. इंग्रजीत असली तरी मराठी काव्यविचारात नव्या इंग्रजी विचाराचा प्रथम प्रवेश घडवून आणणारी म्हणून ही प्रस्तावना मराठी समीक्षेच्या ऐतिहासिक पर्यालोचनाच्या दृष्टीनं अतिशय महत्वाची आहे. काव्य काव्याभिरुची, महाकाव्याचं स्वरूप, टीकेचे प्रकार, रोमेंटिक व क्लासिकल हे संप्रदाय—इत्यादी काव्याशी स्वसंबधित विषयाचं कुंटयांनी या प्रस्तावनेत विवेचन केलेलं आहे. तीत महाराष्ट्रीयांच्या अभिरुचीसंबंधात त्यांनी जे विवेचन केलेलं आहे ते लक्ष वेधून घेण्यासारखं आहे—अभिरुचीच्या दृष्टीनं त्यांनी महाराष्ट्रीय समाजाचे तीन वर्ग पाडलेले आहेत. एक शास्त्रमंडळींचा वर्ग. या वर्गाची अभिरुची कृत्रिम आणि चत्मकृतिनिष्ठ कुंटयांना ही परंपरा पडिताची अभिरुची अगदीच नापसंत होती. ही शास्त्रीमंडळी संस्कृत काव्यप्रेमी, सस्कृतच्या दृष्टिकोनातून मराठी कवितेकडे पाहणारी, नव्या मराठी कवितेचं स्वरूप समजून घेण्याविषयी पूर्ण अनास्था बाळगणारा—अभिरुचीला वर्गीकरणाच्या दृष्टीनं आंग्लशिक्षित हे दुसऱ्या वर्गात मोडणारे. याची अभिरुची सुधारलेली यांची दृष्टीही व्यापक आणि उदार. पण त्यांच्यात काळातल्या मराठी कवितेची रसग्रहणपूर्वक कदर करण्याच्या प्रवृत्तीचा मात्र त्यांच्यात पूर्ण अभाव. आंग्लशिक्षितांची मराठी कवितेविषयीची ही वृत्ती कुंटयांना आवडत नसे. अभिरुचीच्या दृष्टीनं सामान्य अशिक्षित मराठी माणूस हा तिसऱ्या वर्गात मोडणारा. संस्कृतच्या किंवा इंग्रजीच्या दडपणा पासून मुक्त अस-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लेला. कुंटयांनी या सामान्य मराठी माणसाच्या स्वतंत्र बुद्धीवद्दल, त्याच्या स्वतंत्र अभिरूचीवद्दल आदर व्यक्त केलेला आहे. कुंटयांना क्लासिकल व रोमंटिक या दोन शैलीसंबंधी केलेलें विवेचनही त्या काळाच्या मानानं नवीन आहे, महत्वाच आहे. कुंटयांनी ही इंग्रजी प्रस्तावना मराठीत अनुवादित होऊन स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपानं प्रसिद्ध होणं आवश्यक आहे. कारण समीक्षेतला नवा इंग्रजी विचार महराष्ट्राला पटवून देण्याचा पहिला प्रभावी प्रयत्न याच प्रस्तावनेत झालेला आहे.

इंग्रजीच्या संपर्कानं त्या काळात स्वतंत्र मराठी वाङ्मयविवेचन होऊ लागलं होत याची साक्ष म्हणून का. बा मराठे यांचा "नावल व नाटक" ह्यांविषयी निबंध या नावाचा स्वतंत्र टीकात्मक निबंध विशेषकरून उल्लेखिण्यासारखा आहे. इंग्रजीतल्या नॉहलशी जुळणारा नावल हा शब्द त्यांचे कादंबरीसाठी वापरलेला आहे. मराठीच्या आरंभाच्या काळातील कथाकादंबऱ्याच आणि नाटकांचं निर्भीड गुणदोषपरीक्षण करणारा हा मराठयांचा टीका-प्रबंध मराठीतील टीकावाङ्मयांच्या इतिहासात त्या प्रकारचा पहिलाच प्रबंध म्हणून विशेष महत्वाचा आहे.

अशा रीतीनं अव्वल इंग्रजी कालखंडातल्या मराठीतल्या समीक्षावाङ्मावर एकाचवेळी समांतर रीतीनं संस्कृत आणि इंग्रजी हे दोन्ही प्रभाव कार्यक्षम होत होते. काव्याची, काव्यविषयक, अभिरुचीची, नावलनाटकाची चर्चा कुंटे-मराठे बहुतांशी इंग्रजाच्या आश्रयानं करीत होते तर १८६७ साली सुरू झालेल्या विविधज्ञानविस्तार नामक मासिकांतून रा. भि. गुंजारक हे संस्कृत काव्यशास्त्राचा आधार घेऊन काव्यविकार नावाची लेखमाला गुंफीत होते. इंग्रजींच्या धर्तीवर शालापत्रक व विविधज्ञानविस्तार या मासिकांतून नवप्रकाशित ग्रंथावरची परीक्षणं प्रसिद्ध होत होता आणि या परीक्षणलेखांतूनहि वाङमयसबंधीचा तात्विक विचार प्रगट होत होता. उदाहरणार्थ नित्सु-यांच्या विसाधनप्रशंसा या काव्याच शालापत्रकातून समीक्षण करीत असताना विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी, कवितेच्या मुख्य संबंध काल्पनाशक्तीशी कसा आहे हे पटवून दिलेलं आहे. या परीक्षणलेखातून त्याकाळी प्रसिद्ध झालेल्या अनेक महत्वाच्या पुस्तकांचं अत्यंत पारखडपणं गुणदोष दिग्दर्शन करण्यात आलेलं आहे. आधुनिक मराठीतील परीक्षणवाङमयाची मुहूर्तमेढ रोवण्याचं महत्वाचं कार्य या लेखांनी केलेलं आहे.

पुस्तकपरीक्षाणाचं क्षेत्र या अव्वल इंग्रजीत समृद्ध करण्याचे श्रेय बाळकृष्ण मल्हार हंस यांनाही देणं आवश्यक आहे. त्यांनी तुकाराम, मोरोपंत, आणि वामन पंडित यांच्यावर अनुक्रमे इ. स. १८८०, १८८२ व १८८४ मध्ये समीक्षणात्मक निबंध लिहिले. या निबंधातून त्यांचो सूक्ष्म मर्मज्ञ रसिकता आणि सुसंस्कृत अभिरूची प्रकट झालेली आहे. तुकारावरील निबंधापेक्षा मोरोपंतांवरील व वामनपंडितांवरील निबंध अधिक सरस उतरलेले आहेत. हंसांनी काव्यपरीक्षण करताना संस्कृतातील समीक्षमूल्य स्वीकारलेली आहेत.

अव्वल इंग्रजीतील साहित्यशास्त्रीय लेखनाचा एक स्तुत्य प्रयत्न म्हनून जनार्दन सखाराम गाडगीळ यांचा शैलीवरील निबंध आवर्जून निर्देशिण्यासारखा आहे. इ. स. १८६३ मध्ये ज्ञानप्रसारकमासिकमध्ये तो प्रकाशित झालेला आहे. संस्कृतातला रीतिविचार प्रसिद्ध आहे आणि तो समृद्धही आहे. गाडगीळांनी मात्र आपलं शैलीववरील विवेचन या रीतिविचाराचं साहाय्य न घेता केलेल आहे, चांगल्या शैलीचे घटक कोणते असावे या संबंधी गाडगीळांनी केलेलं विवेचन समर्पक असून इंग्रजीतील आणि समकालीन मराठीतील उदाहरणांनी ते सपन्न केलेलं आहे. शैलीदार लेखनात भाषाचातुर्य असावं, प्रसादगुणांत ते युक्त असाव, एकात्म संस्काराचं त्यात सामर्थ्य असावं, त्यात विचाराची प्रौढता असावी आण विचारशक्ती व कल्पनाशक्ती याच त्यात ऐक्य साधलेलं असावं. कल्पनाशक्ती आली की तिच्या अनुषंगान लेखनात पदलालित्य, वाक्यलालित्य आणि विचारलालित्य हे गुण प्रकट होतात-असं थोडक्यात गाडगीळाचं प्रतिपादन आहे. अलंकाराची अतिरिक्त हौस टाळावी असा योग्य उपदेश शैलीकार होऊ इच्छिणाऱ्या लेखकांना त्यांनी दिलेला आहे. मराठीतील वाङमयसमीक्षेच्या इतिहासात गाडगीळांच्या या शैलावरील निबंधाला निश्चितच महत्वाचं स्थान आहे.

अव्वल इंग्रजीतील समीक्षेच्या तात्विक आणि प्रात्यक्षिक अंगात ज्यांनी महत्वाची भर घातली अशा राजवाडे, प्रधान, लेले, दादोबा पांडुरंग, गोडबोले, कुंटे, मराठे, गुंजीकर, हंस, गाडगीळ ही नाव आपण पाहिली. पण अव्वल इंग्रजीतली म्हणजे १८१८ पासून १८८५

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पर्यन्तच्या कालमर्यादेखाली ही सगळी नाव याच कालमर्यादितल्या एका नावापुढे अगदीच फिकी वाटण्यासारखी आहेत. ते प्रभावशाली नाव विष्णुशास्त्री चिपळूणकरांचं, इंग्रजी राज्यामुळं आलेल्या न्यूनगंडाचं निराकरण करून मराठी लोकांना स्वातंत्र्याचा, स्वाभिमानचा तेजस्वी मंत्र शिकविण्याऱ्या या मराठी भाषेच्या शिवाजीचं, महाराष्ट्राला खऱ्या आधुनिकत्वाचं दर्शन विष्णुशास्त्री चिपळूणरांनीच घडविलं. व्यापक राष्ट्रीय जीवनात घडविलं. तसच वाङमयीन विचारांच्या क्षेत्रातहि घडविलं. जुन्याचा संपूर्ण धिक्कार करून नवीनाचाच फक्त स्वीकार करणं म्हणजे आधुनिकत्व नव्हे आधुनिकत्व म्हणजे निराधार, निरालंब अवस्थेत लटकणारी, लोंबकळणारी वस्तू नव्हे. आधुनिकतेला प्रगतीचं वेड असतं, पण तिचं परंपरेचं स्मरण अजिवात लुप्त झालेलं नसतं. प्रगतिप्रेमाच्या वस्त्रात काही धागे परपरेपासून घेतलेल्या विचारांचे असतात. आनिकवुत्वत परंपरा आणि प्रगत यांचा योग्य समन्वय साधलेला असतो. अशाच अर्थानं विष्णुशास्त्री चिपळूणकरांची विचारसरणी आधुनिक होती. तिच्यात प्रगतीची ओढ होती पण त्याचबरोबर परंपरेबद्दल जिवंत, आस्थाही होती. यामुळंच तर टिळक आणि आगरकर या परस्परविरोधी मतांच्या नेत्यांच्या मनात विष्णुशास्त्री चिपळूणकराबद्दल विलक्षण आदरबद्धी होती. चिपळूणकरांची आधुनिकता त्यांच्या टीकादृष्टीहि प्रकट झालेली आहे. आधुनिक मराठी समीक्षेचे जनक म्हणून संबोधिले जाण्याचा मान त्यांचाच आहे. १८७२ साली त्यांनी शालापत्रकातून कविता या विषयावर लेख लिहावयाला सुरवात केली. पहिल्या लेखात त्यानी कवितेच्या तीन अवस्था वनविल्या आहेत. अंत:करणाचे स्वाभाविक उदगार ही कवितेची उत्तम अवस्था. अंत:करणस्फर्तीवर जिच्यात अलंकाराचे संस्कार केलेले असतात ती कवितेची दुसरी मध्यम अवस्था आणि जिच्यात हृदयद्रावकता मुळीच नसून अलंकाराचा केवळ कृत्रिम भरणा असतो ती कवितेची तिसरी निकृष्ट अवस्था. दुसऱ्या लेखात त्यांनी इंग्रजी कवितेच्या आधारानं या तिन्ही अवस्थांचं सोदाहरण विवेचन केले, तिसऱ्या लेखकांत त्यांनी कालिदास, भवभुती, बाणभट्ट सुबंधु व दंडी या पाच संस्कृत कवींचा परामर्ष घेतला. हे सस्कृत कवींवचचेच लेख पुढे "सस्कृत कविपंचक या पुस्तकाच्या रूपानं प्रसिद्ध झाले." "संस्कृत कविपंचक" हे पुस्तक म्हणजेच मराठीतलं आधुनिक समीक्षेचं पहिलं उदाहरण. तेही का ? तर अत्यंत भरदार मार्मिक आणि डौलदार. चिपळूणकर हे परंपरेचे अभिमानी म्हणून प्रसिद्ध आहेत, आणि संस्कृत कवीवरील त्यांच्या रसास्वादयुक्त प्रेमात हा अभिमन व्यक्तही झालेला आहे, पण त्याचं हे प्रेम आंधळं असून डोळस आहे. म्हणूनच तर त्यांना जुन्या मल्लिनाथी टीकापद्धतीच्या मर्यादा दाखवून ती बाजूला सारलेली आहे आणि तिच्याएवजी इग्रजीतील टीकालेखन पद्धतीचा त्यांनी पुरस्कार केलेला आहे चिपळूणकरांच्या परंपरा प्रेमाला राष्ट्राभिमान आणि भाषाभिमान असे दोन तेजस्वी पैलू आहेत. आपल्या राष्ट्राची वाङमयीन परंपरा किती थोर आहे हे पटवून देण्यासाठी त्यांनी संस्कृत कविपंचकाचा उपयोग करून घेतलेला आहे. पुन्हा संस्कृत ही यांच्यामते मराठीची जननी. त्यामुळं सस्कृतचा अभ्यास हा मराठीच्या अभिवृद्धीला व तिचं व्युत्पत्तिज्ञान होण्याला साहाय्य करणारा म्हणून महत्वाचा असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. म्हणजे त्यांच्या "संस्कृत कविपंचक" या पुस्तकात परपरेबद्दलचा योग्य तो आदर, पाश्चात्य टीकापद्धतीचा गुणग्रहणपूर्वक स्वीकार, राष्ट्रदृष्टी आणि मराठीच्या विकासांबद्दलची आस्था असे चतुर्विध गुण प्रगट झालेले आहेत. थोडक्यात शेवटी समारोपाबद्दल असं म्हणता येईल की मराठी समीक्षेच्या क्षेत्रातलं राजवाडे, प्रधान, लेले दादोबा, पांडुरंग, गोडबोले, हंस, गाडगीळ यांचं कर्तृत्व महत्वाच, कौतुक करण्यासारखं असलं तरी मराठीतील आधुनिक समीक्षेचं उद्घाटन विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या "संस्कृत कविपंचकानंत्र केलेलं आहे. ते श्रेय" संस्कृत कविपंचकाला देणं हे न्याय्य आहे, वस्तुस्थितीला धरून आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी समीक्षेचा विकास :

प्रा. मधुकर शंकर वाबगावकर

आधुनिक मराठी समीक्षा स्थूलमानाने "विविध ज्ञान-विस्तारा" पासून सुरू झाली. चिपळूणकर, आगरकर हे या कालखंडातील किंबहुना एकूण आधुनिक मराठीतील साहित्यविचारांचे खरे जनक. या काळातील साहित्य-विचार प्राय: परीक्षणलेखातून व काही तात्विक स्फुट-लेखांतून व्यक्त झाला. होय, आरंभकाळी मराठी समीक्षेची वाटचाल जुन्या संस्कृत साहित्यशास्त्रच्या आधारानेच सुरू झाली. दाजी शिवाजी प्रधान ह्यांचा १८६८ तला "रसमाधव" हा ह्या विषयातला आद्यग्रंथ. तो भानुदत्ताच्या संस्कृत रसतरंगिणीवर आहे. गणेश शास्त्री लेल्यांचे साहित्यशास्त्र (१८७२) कृष्णाशास्त्री राजवाडयांचे "अलंकारविवेक" व "अलंकारादर्श", केसकरशास्त्र्यांचा "अलंकारविकास" (१८८६) तळेकर शास्त्र्यांचे "अलंकारदर्पण" (१८८६) ज. वि. दाम-ल्यांचा "अलंकारदर्श [१८८५], [बळवंत कमलाकर] माकोडयांचा "रसप्रबोध" [१८९२], राजारामशास्त्री भागवतांची अलंकारमीमांसा [१८९३], इ. हे सर्व आद्यग्रंथ आशयदृष्टया काव्यप्रकाश, साहित्यदर्पण, काव्यादर्श व कुवलयानंद ह्या प्रसिद्ध संस्कृत ग्रंथावरच आधारित होते. [वामन एकनाथ क्षीरसागरांचे "कुवलयानंदा" चे समूळ मराठी भाषांतर १८९६ त प्रसिद्ध झाले] साहित्य-शास्त्राच्या इतर अंगापेक्षा अलंकारचर्चेलाच ह्या आरंभ-कालीन ग्रंथात प्राधान्य मिळाले. त्यात गतानुगतिकत्वच अधिक असले तरी परंपरेपासून वेगळा स्वतंत्र बुद्धीचा अलंकार विचार राजारामशास्त्री भागवतांच्या "अलं-कारमीमांसेत दिसतो. आणि माकोडयांनी १८९२ साली आपल्या "रसप्रबोधा" च्या समारोपात आपल्या जुन्या साहित्यशास्त्राला नवविचारांचे वळण लावण्याची आव-श्यकता इंग्रजी वाङमयाच्या परिचयामुळे कशी उत्पन्न झालेली आहे याची जाणीव त्या काळात व्यक्त करावी हे लक्षणीय होय.

काव्यपरीक्षणात्मक समीक्षाग्रंथात 'केकावलि', वरील दादोबा पांडुरंगाचा "यशोदा पांडुरंगी" [१८६५] व परशुरामपंत तात्या गोडबोल्यांचा "केकादर्श" हे आद्य व उत्कृष्ट प्रस्तावना (१८६९) व का. बा. मराठ्यांचा "मराठी नावल व नाटके ह्याविषयींचा निबंध" (१८७२) ह्यांतून वाङमयविषयक नव्या जाणिवांचा, नव्या अभि-रुचीचा व वास्तवतेचा तीव्र आविष्कार झाला होता. वा. म. हंसाचे "तुकाराम" (१८८०) "मोरोपंत" (१८८२) व "वामनपंडित" (१८८४) ह्या कवींवरील समीक्षाग्रंथ आवर्जून उल्लेखिले पाहिजेत. पण ही सर्व काव्यसमीक्षा संस्कृत साहित्यशास्त्राची मूल्ये, निकष व पद्धती याच्या मर्यादितच होत राहिली. काव्यपरी-क्षणाच्या आंग्लपद्धतीच्या आधुनिक दृष्टीचा आढळ चिपळूणकरांच्या १८७६ ते १८७८ च्या दरम्यान संस्कृत कविपंचकावर लिहिलेल्या निबंधातच प्रथम होतो. म्हणू-नच आरंभी म्हटले की, अर्वाचीन मराठी समीक्षेचे आद्य-जनक चिपळूणकर होत. "ग्रंथाच्या रचनेवरच जर नजर द्यायची असली तर त्याच्या बीभत्सत्वाचा वगैरे विचार निराळाच ठेवला पाहिजे. चितार्‍याचे किंवा मूर्तिकाराचे कसब बीभत्सपणामुळे जसे कमी धरता येत नाही तशीच ग्रंथकाराची गोष्ट होय." ह्या "मनोरमा" नाटकाच्या आपल्या परीक्षणांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मांड-लेला अगदी अद्ययावत वाटणारा विचार त्यांच्या ठिकाणी वसत असलेल्या विशुद्ध वाङमयीन रसिकतेच्या जाणिवेचा द्योतक होय. त्यांची ही दृष्टी केवळ कला-वादाला जवळची वाटली तरी त्यांची स्वत:ची साहित्य-निर्मिती मात्र प्रकटपणे उद्बोधनवादीच आहे हे लक्षात घ्यायला हवे.

इंग्रजी काव्यदृष्टी आत्मसात करून तिच्या अनु-रोधाने मराठी काव्याची मार्मिक समीक्षा करणारे या काळातले प्रसिद्ध समीक्षक प्रा. वा. ब. पटवर्धन होत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांचा " काव्य आणि काव्योदय " हा ग्रंथ (१९०९) म्हणजे मराठी काव्यसमीक्षेतला एक महत्वाचा टप्पा. काव्योदय आणि भौतिक व मानवी परिस्थिती यांतील परस्परसंबंध स्पष्ट करून " सृष्टीचें भौतिक स्वरूप महाराष्ट्रात काव्यपोषक असताही निसर्गोद्गाराची किंवा निसर्गवर्णनाची कविता महाराष्ट्रात उदित झाली नाही. याबद्दल त्यांनी खेदाश्चर्य व्यक्त केले आहे, पटवर्धनांच्या रसवंतीत प्रौढपणापेक्षा तीव्रता व गंभीरतेपेक्षा वेगवत्ता विशेष आढळते. त्यांच्या कल्पनातही वारंवार असंदिग्धतेपेक्षा टिपरघाईच जास्त नजरेस येते." हा बा. अ. भिडयांचा पटवर्धनांच्या ह्या ग्रंथाविषयींचा १९२२ च्या विविधज्ञान-विस्तारातील अभिप्राय निःसंशय मार्मिक वाटतो.

या काळात नियतकालिकांतून व विशेषतः विविधज्ञान-विस्तारांतून तत्कालीन उत्तमोत्तम ग्रंथांची व्यापक व स्वतंत्र समीक्षण दृष्टीने लिहिण्यात आलेली परीक्षणेही मराठी समीक्षेच्या एकूण विकासाला प्रेरक व पोषक ठरली. ह्या परीक्षणलेखकात बा. ना. देव, वा. दा. मुंडलें, वि. मो. महाजनि, बा. अ. भिडे, ना. गो. चापेकर, चिं. वि. वैद्य, लक्ष्मण शास्त्री लेलें, पां. दा. गुणे, वि. स. वाकसकर, श्री. कृ. कोल्हटकर, इ. कितीतरी नावे स्मरतात. त्यातही काही गंमती स्मरणीय आहेत. प्रि. गोळयांच्या "हिंदुधर्म आणि सुधारणा" ह्या ग्रंथाच्या परीक्षणात "हा हास्यास्पद ग्रंथ लिहून वाचकांस पोटभर हंसविल्याबद्दल " ग्रंथकर्त्याचे उपकार मानले आहेत. केशवसुतांच्या काव्यावरील डॉ. पां. दा. गुणे ह्यांचा" मनोरंजनावरील (ऑक्टोबर १९१७) परीक्षालेख, रहाळकरांचे केशवसुतांवरील "मनोरंजनां" तील लेख, हे विशेष उल्लेखनीय असे तत्कालीन टीकालेखनाचे नमुने. लक्ष्मणशास्त्री लेल्यांनी " विनायकाच्या कविते"चे जे परीक्षण केले आहे त्यात एकूण लेखाच्या फक्त एक अष्टमांश भागात विनायकाच्या कवितेचा विचार असून बाकी भागात त्या काव्यग्रंथाला जोडलेल्या कविचरित्रावर व प्रस्तावनेवरच टीकेची झोड उठविली आहे

तत्कालीन मराठी समीक्षेच्या विकासात ना. म. भिडे व बा. अ. भिडे ह्यांचे लेखन विशेष उल्लेखनीय म्हटले पाहिजे. (त्यातही ना. म. भिडे यांचे समीक्षालेख अलीकडे ग्रंथरूपाने संकलित झाले आहेत. तसे बा. अ. भिडे ह्या अत्यंत मार्मिक, चतुरस्त्र, चोखंदळ समीक्षकाचे टीकालेख ग्रंथरूपाने एकत्र उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे.) "ग्रंथकाराने प्रतिपादन केलेल्या सिद्धांताचा समतोलपणे विचार करणें हा टीकाकाराचा पहिला गुण मानावा लागेल असे जे मत ना. गो. चापेकरांनी आपल्या "साहित्यसमीक्षण" ह्या टीकालेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत मांडले आहे ते त्यांच्या स्वतःच्या टीकालेखांबाबतही खरे ठरते. " प्रचलित मराठी साहित्याची सामान्य चिकित्सा" (वि. विस्तार १९१७) व कै. मोगरे आणि रे. टिळक यांच्या कवितेवरून व्यक्त होणारे अर्वाचीन मराठी काव्याचे सामान्य स्वरूप" (विस्तार, १९१६) (रा. ना. ब्रम्हनाळकर) अशांसारखे विशिष्ट वाङमयप्रकारांतील प्रवृत्तींचे समालोचन करणारे लेखही या काळात आढळतात. मात्र या काळातील परीक्षणलेखनात टीकाविषयीभूत ग्रंथांचे कलादृष्टीपेक्षा वैचारिकदृष्टीने मूल्यमापन करण्याची प्रवृत्तीच प्रभावी असलेली दिसते. म्हणजे परीक्ष्यग्रंथाचे रचनासौंदर्याच्या, अभिव्यक्तिरूपाच्या, भाषासौंदर्याच्या वा भावसौंदर्याच्या दृष्टीने विवेचन करण्यावर भर न देता त्यातील आशयांतर्गत वैचारिक घटकांच्या परीक्षणावर व खंडनमंडनावरच अधिक भर दिसतो. वाङमयातील आशयाच्या इष्टानिष्टत्वाचा समाजावर इष्टानिष्ट परिणाम होतो ही जाणीव येथे गृहीत धरल्यासारखीच दिसते. या कालखंडातील समीक्षेची ही परीक्षणदृष्टी या काळातील अन्य वाङमयप्रकारातून प्रकट होणाऱ्या वाङमयदृष्टीशी सुसंगतच आहे.

हरिभाऊ आपटे, टिळक, आगरकर, शि. म. परांजपे, खाडिलकर, राजवाडे आणि श्री. कृ. कोल्हटकर अशा श्रेष्ठींची नावे ह्या काळातील समीक्षेच्या विकासाचे ऐतिहासिक समालोचन करताना सहजच डोळ्यापुढे येतात. टिळकांचे, वैद्यांच्या महाभारतावरील आणि पारखीशास्त्र्यांच्या "बाणभट्ट आणि श्रीहर्ष" या ग्रंथावरील लेख, परांजप्यांचे संस्कृत नाटकांवरील लेख अथवा "मेघदूतावरून कालिदासाविषयी" हा मार्मिक लेख, राजवाड्यांचा "कादंबरीवरील निबंध" या संदर्भात सहजच स्मरतात. राजवाड्यांनी " उत्तमोत्तम कादंबरीकार व्हावयास जाज्वल्य मनोवृत्ती पाहिजे ", हे मत तळमळीने मांडले आहे तर खाडिलकरांनी "रणांगणापासून जसा वीरवृत्तीचा उगम, तशीच पुरुषार्थापासून, वीरवृत्तीपासून, राजवैभवापासून रसाची, काव्याचीहि उत्पत्ति आहे. तपःसामर्थ्य वाढवा, पुरुषार्था-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कडे दृष्टी लावा म्हणजे काव्यरस सहज प्रकट होईल" असे म्हटले आहे. राजवाडे, परांजपे, खाडिलकर हे राष्ट्रीयवृत्तीचे ध्येयवादी लेखक म्हणून राष्ट्रोन्नत्ति, वीरवृत्तीचे पोषण, उदात्त गुणांची जोपासना हेच वाङ्मयीन प्रयोजन त्यांनी पुरस्कारावे हे स्वाभाविक; पण ह्या साहित्यशास्त्र-विचाराला पुरेसे समाजशास्त्रीय अधिष्ठान दिलेले त्यांच्या एतदविषयक प्रतिपादनात अभावानेच आढळते.

लोकशिक्षण हा विदग्ध वाङमयाचा हेतू आहे हे हरिभाऊही सांगतात. (त्यांच्यामते वाङमयाचा अप्रत्यक्ष हेतू सत्य हाच आहे पण प्रत्यक्षात कवीने सत्याभासच निर्माण केला पाहिजे. मधुर अनुपानातूनच सत्याचे औषध दिले पाहिजे) कला म्हणजे काय याचा विचार करताना आपल्या "विदग्धवाङमयात" हरिभाऊंनी हे सांगून " याचा अर्थ कलेला निर्बन्ध नाही असे नव्हे " असे मुद्दाम स्पष्टीकरण केले आहे. त्यांच्या मते "लोकतंत्री राज्यातल्याप्रमाणे कला आपले नियम आपणच तयार करते व त्या नियमांप्रमाणे वागते. तिच्यावर दुसऱ्याने बाहेरून बंधने लादून चालणार नाही." "रस" "अर्थ" व "वैदग्ध" ही विदग्ध वाङमयाची अविभाज्य अंगे आहेत असे जेव्हा हरिभाऊ म्हणतात तेव्हा आशय आणि अभिव्यक्ती यांची अभिन्नताच मांडत असतात.

आगरकरांचा वाङमयविचार त्यांच्या " शेक्सपिअर, भवभूति आणि कालिदास", "कवि, काव्य, काव्यरति, हॅम्लेटची प्रस्तावना" इत्यादिकांत दिसतो. "संवेदना", " इच्छा " व " ज्ञान " ह्या मनुष्याच्या मनोधर्मापैकी संवेदनेशी काव्याचा विशेष संबंध आहे हे त्यांनी मांडले आहे. किंबहुना मानसशास्त्रीय विचारावर आधारलेला काव्यतत्वविचार करणारे आगरकर हे पहिले आधुनिक काव्यचिकित्सक. शिवाय त्यांची ही काव्यचिकित्सा संस्कृत साहित्यशास्त्राच्या सावलीतून बाहेर पडलेली आहे. काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा विचार व कविमनाचा शोध मराठी साहित्यविचारात त्यांनीच प्रथम आणला. (पुढे केळकरांनी देखील ह्या मताचे खंडन केले.) कवींच्या यथार्थ वर्णनांनी काव्यवस्तूंशी वाचकांच्या आणि प्रेक्षकांच्या मनाचे तादात्म्य झाले तर त्यांनाही कवीसारखाच आनंद होईल." ह्या उभयपक्षी तादात्म्याचा आणि त्याच्या समबलतेचा सिद्धान्त आगरकरांनीच प्रथम मांडला.

ह्या कालखंडातील समीक्षाविकासात कोल्हटकरांच्या कर्तृत्वाचा वाटा सिंहाचा आहे. १८९३ पासूनच आपल्या प्रदीर्घ परीक्षण लेखांच्या द्वारा जणू नवे साहित्यशास्त्र ते सिद्ध करीत होते. पारंपरिक रसविचाराचा त्यांनी पुनर्विचार केला. वाङमयाचे "सारस्वत" लिटरेचर ऑफ पॉवर" व "गाणपत" लिटरेचर ऑफ नॉलेज" असे दोन भेद त्यांनी कल्पिले व या दोहोंचे हेतू व स्वरूप भिन्न मानून सारस्वताची इतर ललितकलांशी तुलना केली. त्यांच्यामते "बोध व काव्य ह्या कल्पनाच परस्परविरुद्ध आहेत. बोधाच्या आवश्यकतेचा आग्रह धरणारे लोक, कण्वमुखाने सर्व सासुरवाशिणीस उपदेश करण्याचा " शुश्रूषस्व गुरुन्..   " या श्लोकाचा हेतु आहे असे प्रतिपादन करतात." या प्रकारे नीतिबोधाचा हेतू वेठीस धरावयास सापडला नाही तर निदान शुद्ध व अलंकृत भाषेच्याद्वारे व्याकरणाचे व साहित्याचे ज्ञान देण्याचा हेतू तरी, प्रत्येक सुंदर काव्यात सापडतोच असा औपरोधिक प्रहार नीतिवाद्यांवर कोल्हटकर करतात. श्री. न. चिं. केळकरांनी कोल्हटकरांच्या समीक्षापद्धतीविषयी म्हटले आहे की, "त्याची टीका सुरू झाली म्हणजे वाचकाला आपण ती एक शिकार पाहत आहो असे वाटते, खेळ पाहतो असे वाटत नाही. ग्रंथकाराच्या गैरहजेरीत त्याच्या ग्रंथ निर्मितीचे सावज कोल्हटकरांच्या हाती एकटे सापडले आहे व सर्व प्रकारची घातक बौद्धिक हत्यारे व साहित्यक्रिडेतील सवंगडी पारधी बरोबर घेऊन कोल्हटकर त्याच्यावर तुटून पडले आहेत, असाच भास त्यांचे टीकालेख पाहून होतो." पण लक्ष्यात कोण घेतो ? चे कोल्हटकरांनी तेवीस पानी परीक्षण लिहिले आहे पण त्यातील बावीस पानात सामाजिक सुधारणेवरील आक्षेपांचे खंडन आणि केशवपन प्रतिबंधाचे मंडन केलेले असून फक्त एका पानात परीक्ष्य कादंबरीचा परामर्श आटोपला आहे. म्हणजे आनुषंगिक अवाङमयीन प्रश्नांची चर्चाच पृष्कळदा त्यांच्या टीकालेखात ऐसपैस वावरते. परीक्ष्य ग्रंथाच्या संदर्भात साहित्यशास्त्रीय प्रमेयांची सविस्तर चर्चा जेव्हा ते करतात तेव्हा ती मात्र विलक्षण उद्बोधक असते. "तोतयाच्या बंडा" वरील त्यांच्या प्रसिद्ध टीकालेखात नाटक ह्या साहित्यप्रकाराच्या मूलतत्वांसंबंधी त्यांनी केलेले विवेचन नाट्यरचनाशास्त्राची ओळख करून घेण्याच्या दृष्टीने आजही वाचनीय आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"इंग्रजी वाङ्मयातील टीकापद्धतीप्रमाणे नाटके आणि कादंबऱ्या यांचे कथानक, स्वभावलेखन, मनोविश्लेषण, वातावरण व भाषाशैली इत्यादी प्रश्नांच्या आधारे गुण-दोष विवेचन ठळक रीतीने करणारे श्री. कृ. कोल्हटकर हे मराठीतील पहिलेच टीकाकार होत. एकदर वाङ्मय-कलेसंबंधी त्यांनी जे सिद्धांत प्रकट केले आहेत ते मराठीतील आधुनिक टीकाशास्त्राचा मूळ पाया म्हणून मानले पाहिजेत." ह्या काळातील समीक्षा-विकास पाहता ह्या काळात सुसंगतपणे, सर्वांगपरिपूर्ण "साहित्य-शास्त्र" मांडणारा ग्रंथ निर्माण झाला नाही. तसा ग्रंथ निर्मिण्याचे सामर्थ्य कोल्हटकरांच्या ठायी होते. आपल्या परीक्षणलेखांतून तर्कपूत विश्लेषण-संश्लेषणपूर्वक साहित्यतत्व-विचार ते मांडीत होते. पाश्चिमात्य साहित्यविचार सलग ग्रंथरूपाने मराठी समीक्षेला त्यांना देता आला असता. पण तसे घडले नाही.

या कालखंडात जो साहित्यविचार झाला तो मुख्यत्वे ललितसाहित्याचे प्रयोजन व स्वरूप ह्या दोन अंगा-बाबत. त्यातही स्वरूप-विचार हा प्रयोजन-विचाराच्या संदर्भातच झालेला दिसतो. म्हणजे प्रयोजनविचार हाच मराठी साहित्यविचाराच्या केन्द्रस्थानी या काळात तरी राहिलेला दिसतो. पारंपरिक साहित्यशास्त्र व नवटीका-शास्त्र अथवा भारतीय साहित्यशास्त्र आणि पाश्चिमात्य समीक्षा ह्यांच्या संकरणसमन्वयाचा विचार मात्र या काळात फारसा झाला नाही. कला, नीती, चारित्र्य व मूल्यमापन, ललितलेखकाचे सामाजिक उत्तरदायित्व अशा विषयांचा विचार साहित्यप्रयोजनाच्या संदर्भात होई. आणि रसविचार, काव्यानंदमीमांसा, हास्यविनोद-मीमांसा ह्यांचा विचार संस्कृत साहित्यशास्त्राच्या संद-र्भात होई. ह्यापलीकडे जाऊन कलानिर्मितीची प्रक्रिया स्वतंत्रपणे चिंतनविषय झालेली दिसत नाही. मग सौंदर्यवाद, वास्तववाद इ. वाङ्मयीन वादांची चर्चा दूरच राहिली. मराठी समीक्षेचा १९२० पर्यन्तच्या अर्धशतकातला स्वरूप-विकास हा असा आहे.

(नागपूर आकाशवाणीच्या सौजन्याने)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता
(जून–जुलै १९६८)

मा. मो. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

सांस्कृतिक समिती

कवयित्री लक्ष्मीबाई टिळक जन्मशताब्दी

सांस्कृतिक समितीतर्फे सोमवार दि. ८ जुलै १९६८ रोजी सायंकाळी ६–३० वाजतां गडकरी सभागृहात सुप्रसिद्ध कवयित्री व "स्मृतिचित्रे" या आत्मवृत्ताच्या लेखिका कै. लक्ष्मीबाई टिळक यांची जन्मशताब्दी उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख ह्यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.
या प्रसंगी सुप्रसिद्ध कवी प्रा. भ. श्री. पंडित यांचे भाषण झाले.

नट सम्राट कै. बालगंधर्व स्मृतिदिन

सांस्कृतिक समितीतर्फे मंगळवार दि. २३ जुलै १९६८ रोजी रात्रौ ८–३० वाजता नट सम्राट बालगंधर्व यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.
सुरुवातीला आमंत्रक श्री. जयंत देवघर यांचे प्रास्ताविक भाषण झाल्यावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नाट्य–इतिहास-संशोधक श्री के. टी. देशमुख (मुंबई) यांनी बालगंधर्वांच्या छायाचित्राला पुष्पमाला अर्पण केली.
श्री. के. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात कै. बालगंधर्वांच्या कला–गुणांचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला.
यानंतर स्वरमंडळातर्फे नागपूर आकाशवाणीवरील कलावंत श्री. मधुकरराव गुळवणी यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. यावेळी पेटीची साथ श्री. बबनराव आठल्ये व तबल्याची साथ श्री. भय्याजी वडसमुद्रकर यांनी केली.
शेवटी चिटणीस श्री. वा. के. अत्रे यांनी सर्वांचे आभार मानले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला पुस्तकरुपाने देणगी

सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक प्रा. भ. श्री. पंडित यांनी आपल्या खाजगी ग्रंथालयातील काही बहुमोल ग्रंथ श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालयास देणगीदाखल दिले. त्याबद्दल वि. सा. संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

परीक्षा समिती : वि. सा. संघ

केंद्राधिकाऱ्यांना सूचना व विनंती

१) विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङ्‌मयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देश :- मराठी भाषा आणि वाङ्‌मय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील अ-मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

फेब्रुवारी १९६८ पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून विदर्भ माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परीक्षांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२) आपण केन्द्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात येईल. अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३) आगामी आक्टोबर १९६८ सत्राची परीक्षा शनिवार दि. ५-१०-६८ आणि रविवार दिनांक ६-१०-६८ ला घेण्यात येईल.

४) नवीन केन्द्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेत बसविले तरच केन्द्राला मान्यता देण्यात येते असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केन्द्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परीक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केन्द्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केन्द्रातून दिनांक १० सप्टेंबर ६८ पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केन्द्रीय कार्यालयाकडे दिनांक १५ सप्टेंबर ६८ चे आत पाठविण्याची दखल घ्यावी, तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे,

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय
दाखल नोंद क्रमांक 30332
दिनांक 11.2.98
23.
विदर्भ साहित्य संघ नागपूर
R.K

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" [Yugwani] Regd. No. MH 1174

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.

मुद्रणस्थळ : व्हीनस प्रिंटींग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घटना दुरुस्ती समिति

ता. २८ जुलै १९६८ रोजी भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या सर्व साधारण सभेत घटना दुरुस्ती समिति नेमण्याचा ठराव सर्वानुमते पास झाला; व त्या समितीचे सदस्य नेमण्याचा अधिकार अध्यक्षांना देण्यांत आला.

तदनुसार अध्यक्षांनीं समितीत पुढील सदस्य नेमले आहेत :–

(१)	न्या. पाध्ये	अध्यक्ष
(२)	श्री. मा. रा. देशपांडे	सदस्य
(३)	श्री. रांगोळे	सदस्य
(४)	श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी	सदस्य
(५)	श्री. चंद्रशेखर माडखोलकर	सदस्य
(६)	श्री. मा. नी. गलगलीकर	सदस्य आणि आमंत्रक

वि. सा. संघाच्या ज्या सदस्यांना घटनेंत दुरुस्त्या किंवा सुधारणा सुचवावयाच्या असतील, त्यांनी त्या आमंत्रकांकडे पाठवाव्यात, अशी विनंति आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" [Yugwani] Regd. No. MH 1174

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.
मुद्रणस्थळ : व्हीनस प्रिंटींग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रात, १९२३
विदर्भ साहित्य संघ